आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

मंगळवार, १८ जुलै २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -३०१
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● TUESDAY 18 JULY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-301 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# राष्ट्रवादी विरोधी पक्षामध्येच

## जयंत पाटील : मार्ग दाखवा, फुटीर गटाची शरद पवारांकडे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : जी परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यातून मार्ग दाखववावा अशी मागणी अजित पवारांसह मंत्रीपदाची शपथ घेतलेल्या लोकांनी शरद पवार यांच्याकडे केली आहे. शरद पवार यांना कोणीही कधीही भेटू शकते. त्यामुळे कोणी भेटायला आले तर त्यांना ते नाकारत नाही, असे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना म्हटले आहे.**

उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्यासह त्यांच्यासोबत गेलेल्या आमदारांनी आज राष्ट्रवादी कॉँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली. याचपार्श्वभूमीवर राष्ट्रवादी कॉँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि राष्ट्रवादी कॉँग्रेसचे नेते तथा प्रतोद जितेंद्र आव्हाड उपस्थित होते. त्यांनी सांगितले की, सध्या निर्माण झालेल्या परिस्थितून मार्ग काढण्यासाठी आमदार शरद पवारांच्या भेटीला आले होते, असे पत्रकार परिषदेमध्ये जयंत पाटील यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना म्हटले आहे.

ते पुढे म्हणाले की, आपल्या घरात कोणी आले तर विश्लेषणात्मक टिप्पणी करणे योग्य नाही. ते शरद पवार यांना भेटायला आले तेव्हा ते कसे दिसत होते ते नाराज होते का. याच्याशी काहीही संबंध नाही. पवार साहेबांनी आपली भूमिका येवला येथील सभेत अगदी स्पष्ट केली आहे. त्यामुळे प्रत्येक भेटीनंतर शरद पवारां साहेबांनी स्पष्टीकरण दिले पाहिजे असे वाटत नाही. जयंत पाटील म्हणाले की विधीमंडळात रेकॉर्डवर आम्ही सर्व एकच पक्ष आहोत. त्यामुळे काही लोकांनी पक्षविरोधी केलेली कृतीवर कारवाई म्हणून नोटीस बजावलेली आहे. विशेष म्हणजे शरद पवार साहेबांच्या आदेशानेच हे सर्व काम सुरू आहे. आम्ही विधीमंडळात विरोधी बाकावरच बसलेलो आहोत. आमची भूमिका अगदी स्पष्ट आहे असे मत त्यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले आहे

राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष विरोधी पक्षात आहे. शरद पवार साहेब यांच्या राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षात असणारे आमचे सर्व आमदार हे विरोधी पक्षातच बसले आहेत. आमच्यातल्या ९ सदस्यांनी सरकारमध्ये शपथ घेतलेली आहे. हेही खरं आहे परंतु राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाची आजची बैठकीची व्यवस्था बघितली तर सर्व विखुरलेल्या पद्धतीने आणि विरोधी पक्षाच्या बाजूला बसलेले आपण बघितले असेल. त्यामुळे शरद पवार साहेबांच्या भेटीला आमदार आल्याने त्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उद्भवणे योग्य नाही. कारण गेली अनेक वर्ष ज्यांनी शरद पवार साहेब यांच्या नेतृत्वाखाली काम केलं आहे तिच लोक पुन्हा शरद पवार साहेबांना भेटत असतील तर त्यातून शरद पवार साहेबांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण करण्याचं कोणतही कारण नाही असे जयंत पाटील म्हणाले आहे. राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षात अनेक वर्ष ज्यांनी काम केले आहे, ते सर्वचजण शरद पवार यांनी निर्माण केलेल्या राष्ट्रवादीचे एक मोठे कुटुंब आहे. त्यातलेच काही लोकांनी वेगळी कृती केलेली आहे. पण तिच लोक आज शरद पवार साहेबांकडे येऊन भेटले आणि यातून मार्ग काढा अशी शरद पवार यांना त्यांनी विनंती केली आहे. त्यामुळे इतर कोणी अस्वस्थ होण्याची आवश्यकता आहे, असे मला वाटत नाही. शरद पवार साहेब हे देशातले अनुभवी नेते आहेत. त्यांच्याकडे जाऊन आमदारांनी विनंती केली की, निर्माण झालेल्या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी पुन्हा एकदा आग्रहाने सांगितले आहे, अशी माहिती जयंत पाटील यांनी दिली आहे. विरोधकांची उद्याला होत असलेले बैठकी संदर्भात विचारण्यात आले. त्यावेळी जयंत पाटील म्हणाले की, शरद पवार हे युपीएचा भाग आहेत. त्यामुळे बंगळुरू येथे आयोजित बैठकीला जातील त्यांनी त्यांची भूमिका अगदी स्पष्ट केलेली आहे. त्यामुळे त्यांच्यावर कोणतेही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्याचे काम नाही. विरोधकांच्या बैठकीला का गेले नाही. या प्रश्नावर जयंत पाटील यांनी उत्तर दिले.

### चर्चेतली बातमी

## वंदे भारत एक्सप्रेसच्या कोचला आग

आधुनिक केसरी न्यूज

**भोपाळ :** वंदे भारत एक्स्प्रेस' देशभरात चर्चेचा विषय ठरत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते देशातल्या विविध भागात अनेक वंदे भारत एक्स्प्रेसला हिरवा झेंडा दाखवून त्यांचे उद्घाटन करण्यात आले आहे. वंदे भारत एक्स्प्रेसच्या वैशिष्ट्यांबरोबरच या एक्स्प्रेसला होणाऱ्या अपघातांचीही चर्चा पाहायला मिळाली. वंदे भारत एक्स्प्रेस सुरू झाल्यानंतर पहिल्या काही महिन्यांत वन्य प्राणी वा इतर पाळीव जनावरे ट्रॅकवर आल्यामुळे झालेल्या अपघातात काही ट्रेनच्या पुढच्या भागाचे नुकसान झाल्याचे पाहायला मिळाले आहे. आता एका वंदे भारत एक्स्प्रेसच्या कोचलाच आग लागल्याची घटना समोर आली आहे. सोमवारी सकाळी भोपाळ ते दिल्ली वंदे भारत एक्स्प्रेसच्या कोचला अचानक आग लागल्याचं निदर्शनास आले. या कोचमध्ये बसवण्यात आलेल्या बॅटरीला ही आग लागल्याची बाब समोर आली आहे. मध्य प्रदेशमधील रानी कमलापती स्थानकातून ही ट्रेन दिल्लीतील हजरत निजामुद्दीन रेल्वे स्थानकाच्या दिशेने रवाना झाल्यानंतर काही वेळाने हा प्रकार घडला. बॅटरी बॉक्सला आग लागल्याची बाब कुरवाई केथोरा स्थानकाजवळ निदर्शनास आली. यानंतर तातडीने ट्रेन थांबवून अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. ट्रेनमधील सर्व प्रवाशांना बाहेर काढून आग विझवण्याचे काम हाती घेण्यात आले. वंदे भारत एक्स्प्रेसच्या कोचला आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन दल तातडीने घटनास्थळी दाखल झाले आणि ही आग आटोक्यात आणण्यात आली, अशी माहिती रेल्वेकडून जारी करण्यात आलेल्या निवेदनात देण्यात आली आहे.

## जेजुरीत चेंगराचेंगरी; पाच जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** साऱ्या महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या जेजुरीच्या खंडोबा देवाच्या यात्रेसाठी सुमारे चार लाख भाविकांनी गर्दी केली होती. दुपारी एक वाजता पेशवे इनामदार यांनी हुकूम करताच वाजत गाजत पालखीमध्ये खंडोबा म्हाळसादेवीच्या मूर्ती ठेवून पालखी सोहळा कऱ्हा नदीवर स्नानासाठी निघाला. यावेळी " सदानंदाचा येळकोट" असा जयघोष करीत हजारो भाविकांनी भंडाऱ्याची मुक्त उधळण केली यामुळे सारा खंडोबा गड पिवळा धमक झाला. यंदा नेहमीपेक्षा गर्दी प्रचंड असल्याने खंडोबा गडाला असणाऱ्या तीनही दरवाजामध्ये भाविकांची प्रचंड रेटारेटी व चेंगराचेंगरी झाली. आज दुपारी दीड वाजता पालखी गडाजवळील यशवंतराव महाराज यांना भेटली, तिथून निघाल्यावर बानुबाई मंदिराकडे जाताना गणपती मंदिराच्या मागील कमानीजवळ भाविकांचा प्रचंड लोंढा आल्याने पालखी एका बाजूला सरकली, अचानक हा प्रकार झाल्याने पालखी समोर सनई वादन करीत असलेले घडशी समाजातील अनेक तरुण खाली कोसळले. प्रचंड चेंगराचेंगरी झाली, खंडोबाची पालखी अवजड असल्याने खांदेकऱ्यांनी मोठ्या कौशल्याने पालखी सावरली. पाण्याची बंद टाकीजवळ अनेक जण चेंगरले, घडशी समाजातील पाच सनई वादनकारांना गंभीर स्वरूपाच्या इजा झाल्या. अचानक झालेल्या या चेंगराचेंगरीमध्येअनेक भाविक पण जखमी झाले. त्यांना मुका मार लागला सुदैवाने जीवितहानी झाली नाही.

## चित्त्यांचा मृत्यू; तज्ज्ञांचा दावा सरकारने फेटाळला

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** मध्य प्रदेशातील कुनो राष्ट्रीय उद्यानात शुक्रवारी (१४ जुलै) 'सुरज' नावाच्या चित्त्याचा मृत्यू झाला. अवघ्या आठ दिवसात झालेला हा दुसरा मृत्यू होता. आफ्रिकेतून भारतात स्थलांतरित करण्यात आलेल्या चित्त्यांपैकी आठ चित्ते गेल्या चार महिन्यात मृत्यूमुखी पडले आहेत. मार्च २०२३ पासून सुरू झालेले चित्त्यांचे मृत्यूसत्र सुरूच आहे. गेल्या आठवड्यात मंगळवारी 'तेजस' या चित्त्याचा मृत्यू झाला होता. सातत्याने होत असलेल्या या मृत्यूंचे कारण काय असा प्रश्न उपस्थित केला आहे. अशातच आफ्रिकेतील तज्ज्ञांनी अजब दावा केला आहे. आफ्रिकेतील तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार या चित्त्यांच्या गळ्यात बांधलेले रेडिओ कॉलर हे या चित्त्यांच्या मृत्यूंचे प्रमुख कारण आहे. दरम्यान, तज्ज्ञांचा हा दावा केंद्र सरकारने फेटाळला आहे. नामिबिया आणि दक्षिण आफ्रिकेतून आणलेल्या २० पैकी पाच प्रौढ चित्ते हे नैसर्गिक कारणांमुळे मरण पावले आहेत, असे पर्यावरण मंत्रालयाने रविवारी सांगितले. तसेच रेडिओ कॉलरसारख्या घटकांमुळे मृत्यू होत आहेत, असे म्हणण्याला कोणताही वैज्ञानिक पुरावा नाही. हे काहींचे वैयक्तिक अंदाज आणि अफवा असल्याचे पर्यावरण विभागाने म्हटले आहे.



# अधिस्वीकृती समितीवरील संस्था सदस्यांच्या नियुक्त्या रद्द करा


## वसंत मुंडे : माहिती विभागाच्या अजब कारभाराविरुद्ध राज्यभर आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

मुंबई : धर्मादाय आयुक्त यांच्याकडे सोसायटी व ट्रस्ट ॲक्ट अंतर्गत नोंदणी असलेल्या सेवाभावी संस्थांना, पत्रकार संघटना गृहित धरुन अधिस्वीकृती समितीवर सदस्य म्हणून देण्यात आलेल्या नियुक्त्यात तात्काळ रद्द करा. सेवा भावी संस्था आणि संघटना नोंदणीचे स्वतंत्र कायदे आणि विभाग असताना चुकीच्या पध्दतीने प्रस्ताव मंजूर करणाऱ्या माहिती आणि जनसंपर्क विभागातील संबंधितांची चौकशी करुन कार्यवाही करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केली आहे. राज्य पत्रकार संघाच्या वतीने सोमवारी राज्यातील सर्व जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आणि जिल्हा माहिती अधिकारी यांना निवेदन देऊन रोष व्यक्त करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली सोमवार दि. 17 जुलै रोजी राज्यातील सर्व जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आणि जिल्हा माहिती अधिकारी यांना निवेदन देऊन पत्रकारांसाठी असलेल्या अधिस्वीकृती समितीवर नियमबाह्य पध्दतीने धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी असलेल्या संस्थांचे प्रतिनिधी घेण्यात आले आहेत. माहिती विभागाच्या या अजब कारभाराविरोधात रोष व्यक्त करत आंदोलन करुन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महासंचालकांना निवेदने पाठवण्यात आली आहेत. बीड येथे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांची भेट घेऊन निवेदन सादर केल्यानंतर माध्यमांशी बोलतांना मुंडे म्हणाले, महाराष्ट्र शासनाच्या माहिती आणि जनसंपर्क विभागाने 11 जुलै 2023 रोजी राज्य अधिस्वीकृती समितीवर 27 आणि 9 विभागीय समित्यांवर 45 सदस्यांची नेमणूक केली आहे. याच आदेशामध्ये मराठी पत्रकार परिषद या संघटनेवर प्रशासक नियुक्त असल्याबाबत धर्मादाय सहआयुक्त पुणे यांनी कळवले असल्याचे स्पष्ट केले असून संघटनेचे राज्य समितीवर पाच आणि विभागीय समितीवर नऊ असे 14 सदस्य घेण्यात आलेले




आहेत. याच पध्दतीने महाराष्ट्र श्रमिक पत्रकार संघटना तीन, महाराष्ट्र संपादक परिषद दोन, मंत्रालय विधीमंडळ वार्ताहर संघ एक, बृह्न्महाराष्ट्र जिल्हा वृत्तपत्र संपादक संघ एक, महाराष्ट्र दैनिक वृत्तपत्र संघटना एक आणि महाराष्ट्र साप्ताहिक वृत्तपत्र संपादक परिषद एक असे सदस्य घेण्यात आले आहेत. धर्मादाय आयुक्त यांच्याकडे संस्था नोंदणीसाठी 1860 सोसायटी आणि 1950 ट्रस्ट कायद्यांतर्गत सेवाभावी संस्थांची नोंदणी केली जाते. तर असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या मानधन, पगार घेणाऱ्या कामगारांसाठी कामगार कायदा (लेबर युनियन ॲक्ट) 1926 अंतर्गत नोंदणी केली जाते. सेवाभावी संस्था आणि श्रमिक संघटनांसाठी स्वतंत्र विभाग आणि कायदे असताना माहिती आणि जनसंपर्क विभागासह सामान्य प्रशासन विभागानेही कोणतीही खातरजमा न करता धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी असलेल्या सेवाभावी संस्थांना संघटना दाखवून चुकीच्या पध्दतीने अधिस्वीकृती समितीवर सदस्यांची नियुक्ती केली आहे. याची चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करा आणि चुकीच्या पध्दतीने झालेल्या नियुक्त्या रद्द कराव्यात अशी मागणी प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केली आहे. यावेळी ज्येष्ठ संपादक संतोष मानूरकर, बाबा देशमाने, ॲड.शेखर कुमार, व्हाईस ऑफ मिडीयाचे संजय मालानी, बालाजी मारगुडे, संदीप बेदरे, विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी आदिंची उपस्थिती होती. राज्यातील सर्व जिल्ह्यात आंदोलन करण्यात आले. मुंबईत पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस विश्वास आरोटे यांनी तर मराठवाड्यात विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी, विदर्भात प्रा.महेश पानसे, बाळासाहेब देशमुख आणि अमरावती विभागात नयन मोंढे, उत्तर महाराष्ट्रात प्रविण सपकाळे, खानदेशात किशोर रायसाकडा, कोकण विभागात नितीन शिंदे यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणात आंदोलन झाले.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

जहाँ डाल डाल पर सोने की चिडिया करती हैं बसेरा, वो भारत देश हैं मेरा. माझ्या देशातल्या मातीत, पानोपानी सोने आहे. पण त्याची जाणीव तुम्हा आम्हाला नसते. चमकणाऱ्या विदेशी वस्तू आम्हाला आकर्षित करतात. पण जे चकाकते ते सगळेच सोने नसते ही गोष्ट आम्ही सोयीस्कर विसरतो. जेव्हा आमच्या हळदीवर, बासमती तांदळावर, कडुलिंबाच्या औषधी उपयोगांवर दुसऱ्या देशांनी पेटंट घ्यायचा प्रयत्न केला, तेव्हा कुठे आम्हाला जाग आली. अन्यथा आपल्या गोष्टींचे महत्व आम्हाला कुठे ? पूर्वी आमच्या दंतमंजनात कोळसा आणि मीठ आहे म्हणून हिणवणाऱ्या विदेशी कंपन्या आज मोठ्या गर्वाने आमच्या टूथपेस्टमध्ये कोळसा, मीठ वगैरे आहे म्हणून टेंभा मिरवतात. तेव्हा आम्हाला त्याचे महत्व कळते. एखादी गोष्ट जोपर्यंत दुसरे लोक सांगत नाहीत, तोपर्यंत आम्हाला त्याचे महत्व कसे बरे पटावे ? वस्तूंच्या बाबतीतच काय, पण माणसांच्या बाबतीत सुद्धा आम्ही असेच वागतो. स्वामी विवेकानंद जोपर्यंत अमेरिकेतील शिकागो येथे आपले विचार प्रकट करून जगन्मान्य होत नाहीत, तोपर्यंत आम्हाला सुद्धा त्यांचे महत्व कळत नाही. स्वदेशी वस्तू, स्वदेशी वनस्पती, स्वदेशी खाद्यपदार्थ आणि आमच्याकडील विचार, सेवा आणि बुद्धिमत्ता यांचा वरदहस्त असलेली माणसे या सगळ्यांचे महत्व आम्हाला कधी कळणार ? व्होकल फॉर लोकल, आत्मनिर्भर भारत, मेक इन इंडिया या सगळ्या घोषणांचे म्हणूनच महत्व आहे. आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी सांगतात, म्हणून मी हे म्हणतो असे बिलकुल नाही. हा निर्णय आजच्या काळाला सुसंगत आणि आवश्यक असा आहे म्हणूनच त्याचे महत्व समजून घेण्याची गरज आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात सुरुवातीला लोकमान्य टिळक आणि नंतर म, गांधी यांनी स्वदेशीचा नारा दिला होता. स्वदेशी चळवळीची गरज आजही तेवढीच आहे. फक्त आज संदर्भ बदलले आहेत. त्या काळात तो लढा ब्रिटिश सत्तेविरुद्ध होता. आज आपल्याला आपल्या स्वतःसाठी तो लढायचा आहे. जागतिकीकरण, खुल्या अर्थव्यवस्थेच्या या काळात आपल्याला घड्याळाचे काटे उलटे फिरवता येणार नाहीत, पण तारतम्याने विचार करावा लागेल. त्याबाबतचे राजकीय, राष्ट्रीय धोरण राज्य सरकारे, केंद्र सरकार भलेही ठरवील. ते त्यांना ठरवू देत, पण तुम्ही आम्ही आहार विहार, आचार विचाराने स्वदेशी होऊ या. स्वदेशीची जादू कोरोना काळात आपण अनुभवली आहे. लोकल उत्पादने, लोकल मार्केट, लोकल सप्लाय चेन या गोष्टींनी आम्हाला त्या वेळी फार मोठा मदतीचा हात दिला आहे. आपल्या मागण्यांची पूर्तता केली आहे. या लोकललाच आपला जीवनमंत्र बनवला पाहिजे. या कोरोना काळातच आपण अनेक अवघड गोष्टी करून दाखवल्या आणि स्वदेशीची जादू पाहिली आहे. कोरोना काळात ज्यांची तीव्रतेने आवश्यकता भासली असे व्हेंटिलेटर आपल्या देशात कितीसे बनत होते ?



# स्वदेशीची जादू



## आनंदी पहाट

# लग्न झाल्यावर संलग्न होणे गरजेचे

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

अलीकडच्या काळांत विवाहित व्यक्ती एकमेकांपासून कायमस्वरूपी विभक्त होण्याकडे वळत आहेत. काही जण तर एका वर्षाच्या आतच वेगळं व्हायचा निर्णय घेऊ इच्छितात. काही जणांमध्ये अनेक वर्षांच्या सहजीवनानंतर घटस्फोटाचे विचार मनांत यायला लागतात. अर्थात प्रत्येकाची कारणे निरनिराळी असतीलही पण एक-दोन अपत्य असलेल्या व्यक्ती देखील असा विचार जेव्हा करतात तेव्हा त्या दोघांनाही त्यांचीच अपत्य आपत्ती वाटायला लागतात. त्यांच्या विभक्तीमुळे होणाऱ्या परिणामांची जाणीव न होणं हीच उणिव म्हणावी लागेल. एकमेकांच्या प्रामाणिकपणाविषयी संशय येत असेल, तर ते नातं फार काळ चांगलं टिकत नाही. परस्परांच्या भावनांबद्दल नेहमी संवेदनशील राहणं आवश्यक असतं. एखादी व्यक्तिगत मागणी पूर्ण झाली नसेल तर नाराज होण्यापेक्षा त्यामागचं कारण समजून घ्यावं, दुसऱ्याची बाजू देखील लक्षांत घेणं आवश्यक असतं. काहीवेळा गैरसमजांमुळे

अविश्वास निर्माण होत राहतो आणि जोडीदार आपली फसवणूक करतोय असं हळूहळू वाटायला लागतं, ते अधिक घातक असतं. अलीकडच्या काळांत पती-पत्नीच्या मतभेदाला, वादाला पत्नीच्या जवळच्या नातलगांना जबाबदार धरलं जात असल्याचं दिसून येतं. काही प्रमाणांत त्यांचा सहभाग गरजेपेक्षा, जरुरीपेक्षा अधिक असल्याचं देखील चित्र दिसून येतं. ह्यांतही आर्थिक बाब प्रकर्षानं वादाचं निमित्त असल्याचं

कळतं. काहीवेळा मानसिक पातळींवर होणारे परिणाम इतके गंभीर असतात कि संबंधित व्यक्ती जीव देण्या-घेण्याची कृती करण्यास प्रवृत्त होते, ते थांबलंच पाहिजे. अनेकदा स्वभावापेक्षा प्रभावाला महत्व

अधिक दिलं जातं. कालांतरानं परस्परांमधील आभावांची जाणीव व्हायला लागते, दुरावा निर्माण होऊ लागतो. संवादाआभावी निर्माण होणाऱ्या गैरसमजुतीचं वादांत रुपांतर होऊ लागतं.



आधुनिक केसरी

### ब्रह्मानंदी टाळ | निनादतो ||

व्हावे सदा लीन | सत्कर्माचे ठायी ||
पुण्य फळ देई | निष्कामता ||१||
त्रिगुणाचे अंगी | विकाराची सत्ता ||
तीने सकामता | फोफावली ||२||
माया मोह सारे | दुःखाचे कारण ||
जीतेपणी मरण | भोग सारे ||३||
कर्माचे तू वर्म | जाण माझ्या मना ||
फिटेल रे दैना | जन्माची ह्या ||४||
ज्याचे दारी उभा | सोन्याचा पिंपळ ||
ब्रह्मानंदी टाळ | निनादतो ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण

आधुनिक केसरी

यद्यद् भक्ष्यामि तत्तद्धि प्रसादस्ते च रेणुके | अभीष्टफललाभाय दुर्गां देवीं नमाम्यहम् || ४५ ||

हे रेणुके, मी जे काही भक्षण करतो, तो तुझा प्रसाद असू दे. तुला दुर्गा देवीला मी अभीष्टफलाच्या प्राप्तीसाठी नमन करतो.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्ववेंद, मनामनांत स्ववेंद, जनमनांत स्ववेंद !

प्रेम व ज्ञान सम्बन्ध से, सो
है विविध प्रकार ।
मूल ज्ञान कारण रहे,
प्रेम सम्बन्ध विचार ।।२१।।(स्ववेंद पंचम मण्डल चतुर्थ अध्याय) ०५/०४/२१

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
ज्ञानाच्या संबंधामुळे प्रेमाचे विविध प्रकार आहेत. सर्वांचे मुळ कारण ज्ञान आहे. म्हणून प्रेमाचा संबंध ज्ञानपूर्वक झाला पाहिजे.



स्ववेंद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## दुश्चीतनिरूपण

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

पाण्याचा एक थेंब समुद्रात पडला तर तो सागर बनतो आणि तोच थेंब नदीला मिळाला तर गंगेचे पवित्र जल म्हणून आपण ते आचमन करतो व पावन झालो असे समजतो. गंगेच्या पाण्याला सर्वात पवित्र जल असे आपण समजतो. त्याच प्रमाणे जो अत्यंत सावध आहे कष्टाळू आहे, कामात तत्पर आहे त्या व्यक्तिला लवकर परमात्मा पावन करतो. शिष्याची बुध्दि तयार व्हावी लागते.अत्यंत सूक्ष्म बनावी लागते.अशी बुध्दि ज्याच्याकडे असते त्याला परमात्मा लवकर भेटतो. ज्याची बुद्धि अत्यंत सूक्ष्म आहे जो अनन्य होऊन लीन होतो त्याला लवकरच मोक्ष मिळतो. श्रद्धा असल्या शिवाय नुसती सूक्ष्म बुद्धि कामास येत नाही. सर्व बाजूने विचार केला तर श्रद्धा ही सर्व श्रेष्ठ आहे. सुक्ष्म बुद्धि नसेल तर सद्गुरू सांगतात त्याचा बरोबर अर्थ कळत नाही श्रद्धा नसेल तर आत्मवस्तु समजत नाही तोपर्यंत प्रज्ञा व विश्वास या दोनही देहाभिमान नाहीसा करतात. नको असलेली देहबुध्दि गळून पडते. साधनेचे कष्ट करणे गरजेचे असते.त्याशिवाय फळ मिळत नाही. मग ती साधना कोणत्याही प्रकारची असो. सतत कार्यमग्न असणे गरजेचे आहे. शिक्षक, शेतकरी मोठंमोठे ऊद्योगपती, कारखानदार, संशोधक, विद्वानमंडळी जे जे माणसाला आवश्यक असणाऱ्या वस्तू बनवतो ते ते बलुतेदार, शास्त्रज्ञ, गायकही सर्व मंडळी आणि,जो मनुष्य जे जे कर्म करतो ते ते साक्षी भावाने व चांगल्या पवित्र भावाने ईश्वर ईच्छा आहे असे समजून करावे.

# तुम्ही घ्यावे नाम म्हणजे होईल तुमचे काम

आधुनिक केसरी

गरज ही शोधाची जननी आहे असे म्हणतात ना! या जगातले सर्व शोध असेच गरजेतून लागले. गरज कशाची ? तर आयुष्य सुसह्य करण्याची. कोणताही शोध याला अपवाद नाही. आता त्याचा उपयोग कसा केला गेला हा वेगळा मुद्दा, मात्र शोधासाठी शास्त्रज्ञांनी केलेल्या खटपटी मागे मात्र दुर्दम्य इच्छाशक्ती होती. अगदी याच धर्तीवर, याहीपेक्षा तीव्र तळमळीने संतांनी खऱ्या अर्थाने जीवन सुसह्यच नव्हे तर आनंददायक करण्याचा शोध लावला. श्रीमहाराज एके ठिकाणी म्हणतातच, ‘मी समाधानाचा शोध लावला.’ कारण संतांच्या लक्षात आले की बाह्यतः कितीही शोध लावले गेले तरीही जोवर मनुष्य अंतरंगातून सुधारला नाही, तोवर ते शोध त्याला Lasting Happiness देऊ शकत नाहीत. याच ‘अंतरंग परिवर्तनाच्या’ शास्त्राला त्यांनी अध्यात्म शास्त्र म्हटले आणि आपल्या निस्वार्थ अनुभूतीने अनंत जीवांना ते समजावून सांगण्याचा चंग बांधला. आपल्याला माहीत आहेच की ‘Invention’ आणि ‘discovery’ असे दोन शब्द आहेत. Invention म्हणजे ते जे पूर्वी कधीच कुठेच अस्तित्त्वात नव्हते व त्याचा शोध लावला गेला. Discovery म्हणजे जे नेहमी होतेच, केवळ विसरले गेले होते वा त्याकडे लक्ष दिले गेले नव्हते, ते शास्त्रीय रीत्या समोर आणणे! अगदी अशाच रीतीने संतांनी जे नेहमी होते, आहे व कायम राहीलच असे काहीतरी शोधले, अनुभवले व लोकांसमोर ठेवले. यालाच ते नाम असे म्हणतात. महाराजांनी जो समाधानाचा शोध लावला असे ते म्हणाले तो या नामाद्वारे त्यांनी लावला.



जसे आपण वर बघितले की शोध हा आयुष्याला सोपेपणा आणण्यासाठी लावला जातो. अगदी तसेच अध्यात्मिक आयुष्याला, परमार्थाला आत्यंतिक सोपेपणा आणि सहजता देण्याचे काम “नाम” करते म्हटल्यास वावगे ठरू नये! समर्थ मनाच्या श्लोकात म्हणतातच, “मुखे नाम उच्चारिता कष्ट नाही!” हे अजून मनावर ठसवण्यासाठी पुढे म्हणतात,

नव्हे कर्म ना धर्म ना योग काही|
नव्हे भोग ना त्याग ना सांग पाही||
म्हणे दास विश्वास नामी धरावा|
प्रभाते मनी राम चिंतीत जावा||”

(मनाचे श्लोक क्र ७६) म्हणून श्रीमहाराज आजच्या वचनात स्पष्टपणे, कळकळीने, अगदी सोप्या भाषेत आपल्याला सांगतात, फक्त नाम घे, तुझे सर्व काम होईल. काय जबरदस्त विश्वास आहे संतांचा नामावर! भगवंत कसे आहेत ? सर्वव्यापी Omnipresent म्हणतो ना आपण! नाम कुणाचे आहे ? भगवंताचे आहे. नाम आणि नामी यांमध्ये अभेद असल्यामुळे नामीचा सर्वव्यापकत्वाचा गुण स्वाभाविकच नामामध्येही आहे. म्हणूनच जीवनाचे असे एकही अंग नाही, ज्याला नामाचा स्पर्श होत नाही. तुलसीदास म्हणतातच, “राम नाम मानिदीप धरु जीह देहरी द्वार| तुलसी भीतर बाहेरहुं जौं चाहसि उजियार||”

## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी

व्यवहारात सुद्धा आपल्याल गुरू करावा लागतो, तर त्याच्यापेक्षा अवघड ज्ञान होण्यासाठी गुरू नको असे म्हणून कसे चालेल ? पंढरपूरला जायचे असेल तर वाट चालू लागले पाहिजे. मग वाटेत कुणीतरी वाट दाखवणारा भेटतोच; निदान पाट्या तरी आढळतात. . जिथे दोन वाटा फुटतात तिथे एक पंढरपूरची आणि एक गोंदवल्याची पाटी असते, तसे साधनात राहून, जिथे त्या दोन वाटा फुटतात, तिथ पर्यंत या म्हणजे तिथे गुरू उभाच आहे. पण उगीच काही न करता 'पुढे काय आहे ?' हे विचारण्याने काय होणार. प्रपंचात सुखदुःख झाले, सामाधान मिळाले नाही, तर मग खरे सुख कुठे आहे आणि ते मला कोण दाखवील, अशी ज्याला तळमळ लागेल तोच गुरू करील. आता हे पहा रथ आहे खरा, पण जर त्याला सारथी म्हणजे चालवणारा नसेल, तर रथ कुठेतरीच जाईल. केवळ 'गाडी माझी आहे' म्हणून ती मालकाला चालविता येणार नाही. क्रमशः



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

घटं भिन्द्यात् पटं छिन्द्यात् कुर्याद्रासभरोहणम् ।येन केन प्रकारेण प्रसिद्धः पुरुषो भवेत् ॥सरलार्थ - घडा फोडावा. वस्त्र फाडावे. गाढवावर बसावे. (पण) येन केन प्रकारेणपुरुषाने प्रसिद्ध व्हावे. स्पष्टीकरण - या श्लोकाचा रोख घडा फोडणे आणि वस्त्र फाडणे यावर नाही. कबीला एवढेच सांगायचे आहे, की माणसाने आचरटपणा करून प्रसिद्धी मिळवण्याच्या नादाला लागू नये. कारण ती खरी प्रसिद्धीच नव्हे. ती अपकीर्ती ठरेल. प्रसिद्धी मिळवा- यची ती विद्या आणि कला यांच्या आधारेच मिळवावी. पराक्रम, लोकोपकार इत्यादी गोष्टी करूनही मिळवावी.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

मंगळवार, १८ जुलै २०२३

adhunikkesari.com Adhunik Kesari



राजस्थानी मल्टीस्टेट
कार्यक्षेत्र महाराष्ट्र-कर्नाटक

राजस्थानी मल्टीस्टेट
को-ऑप. क्रेडीट सो.लि., परळी वैजनाथ
बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स
मुख्य कार्यालय : मोंढा, परळी वैजनाथ, जि. बीड. मो. 9130072178, 9130072188
कॉर्पोरेट ऑफिस : २०५,२०६, बिल्डिंग नं. २, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड, औरंगाबाद . मो. 9130072176,
टोल-फ्री : 18004197501 rajasthanimultistate.in | संपर्क अनंत भाग्यवंत ९१३००७२१८९



चंदुलाल बियाणी
संस्थापक अध्यक्ष

Rajasthani Multistate MINI BANKING
www.rajasthanimultistate.in
Powered by Tatkal Banking
आता बँकिंग व्यवहार करणे झाले सोपे...
राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सो.लि.,चा
तात्काळ बँकिंगच्या माध्यमातून तब्बल
४९८ बँकांशी होणार सेकंदात व्यवहार...

कोणतेही बँकिंग व्यवहार करणे फक्त 9 सेकंदात शक्य

तात्काळ बँकिंग सुविधा

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मान्यताप्राप्त, NPCI द्वारे संचलित भारत बिल पेमेंट सिस्टम (BBPS), मोबाईल/डी.टी.एच. रिचार्ज आणि इतर सुविधा
* नियम व अटी लागू

कोणत्याही बँकेत पैसे डिपॉझिट करणे. | कोणत्याही बँकेत पैसे ट्रान्सफर करणे. | कोणत्याही बँकेतून पैसे काढणे | मोबाईल बँकिंग सुविधा | Bank Account Verification सुविधा | NEFT/RTGS सुविधा | IMPS/UPI सुविधा | आधार पेमेंट सुविधा | QR Code सुविधा








# अधिस्वीकृती समितीवरील संस्था सदस्यांच्या नियुक्त्या रद्द करा

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई छत्रपती संभाजीनगर शाखेच्या वतीने आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** धर्मादाय आयुक्त यांच्याकडे सोसायटी व ट्रस्ट ॲक्ट अंतर्गत नोंदणी असलेल्या सेवाभावी संस्थांना, पत्रकार संघटना गृहित धरुन अधिस्वीकृती समितीवर सदस्य म्हणून देण्यात आलेल्या नियुक्त्यात तत्काळ रद्द करा. सेवाभावी संस्था आणि संघटना नोंदणीचे स्वतंत्र कायदे आणि विभाग असताना चुकीच्या पध्दतीने प्रस्ताव मंजूर करणाऱ्या माहिती आणि जनसंपर्क विभागातील संबंधितांची चौकशी करुन कारवाई करण्याच्या मागणीसाठी सोमवारी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई छत्रपती संभाजीनगर जिल्हा शाखेच्या वतीने जिल्हा माहिती कार्यालयासमोर निदर्शने करून जिल्हा माहिती डॉ. मिलिंद दुसाने, सहायक संचालक गणेश फुंदे, निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना निवदेन देण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष डॉ. प्रभू गोरे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष शांताराम मगर, संघटक विलास शिंगी, कोषाध्यक्ष मुकेश मुंदडा, प्रसिद्धी प्रमुख संजय व्यापारी, संपर्क प्रमुख आकाश ठाकूर, अकलाख देशमुख, अर्जुन जाधव, दादाभाऊ पवार यांच्यासह विविध दैनिकातील पत्रकारांची मोठ्यासंख्येने उपस्थिती होती.

# शेतकऱ्यांच्या टाळूवरचे लोणी खाणारे शेतकरीविरोधी ट्रिपल इंजिन सरकार

## नाना पटोले : बोगस बियाणांमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विरोधी पक्षांनी भाजपाप्रणित शिंदे सरकारला घेरले. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर स्थगन प्रस्ताव आणला होता पण सरकारने शेतकरी प्रश्नांवर बोलू दिले नाही. बोगस बियाणामुळे शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे पण सरकार फक्त कडक कायदा करु म्हणत वेळ मारुन नेत आहे. राज्यातील भाजपाप्रणित तिघाडी सरकार शेतकरी विरोधी असून शेतकऱ्याच्या टाळूवरचे लोणी खाणारे सरकार आहे, असा घणाघात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. विधिमंडळ परिसरात प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, शेतकऱ्यांच्या प्रश्नावर राज्य सरकार विरोधकांना बोलू दिले नाही, आवाज दाबण्याचा प्रयत्न केला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे शेतकऱ्यांचे नुकसान झाले नाही असे सांगत आहेत. बोगस बियाणामुळे कापसाचे पीकच आले नाही, पिक वाया गेले व वर्षही वाया गेले. मागील वर्षाचा कापूस अजूनही शेतकऱ्याच्या घरात पडून आहे पण शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकार गंभीर नाही. राज्यातील तिघाडी सरकार शेतकरी विरोधी आहे, शेतकरी व जनतेला लुटण्याचे काम सुरु आहे. शेतकऱ्यांना मदत देण्याची घोषणा



सरकारने केली पण अजून मदत मिळालेली नाही. जनतेच्या प्रश्नावर सरकारने उत्तर दिले पाहिजे पण बहुमताच्या जोरावर राज्य सरकार उत्तर देण्यापासून पळ काढत आहे. जनतेने काँग्रेसवर विरोधी पक्षाची जबाबदारी सोपवली असून काँग्रेस पक्ष विरोध पक्षाची जबाबदीर योग्यरितीने पार पाडत सरकारला जाब विचारत राहिल, सभागृहात बोलू दिले नाही तर रस्त्यावर संघर्ष करु.

**राज्यात कॅसिनो सुरु करण्यास काँग्रेसचा विरोध** : महाराष्ट्राच्या संस्कृतीला कलंक लावण्याचे पाप भाजपा सरकारने केले आहे . तरुणांच्या हाताला काम नाही, बरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढलेली असताना राज्य सरकार गोव्याच्या धर्तीवर कॅसिनो सुरु करण्याचे पाप करत आहे . आधीच किराणा दुकानात बियर विकण्यास परवानगी दिलेली आहे, मुंबईसह राज्यात डान्स बारचा सुळसुळाट आहे . अशा परिस्थितीत राज्य सरकार कॅसिनो सुरु करून तरुण पिढीला बरबाद करण्याचे पाप करत आहे . काँग्रेस पक्षाचा राज्यात कॅसिनो सुरु करण्यास विरोध राहील . अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सकाळी विरोधी पक्षाने आक्रमक भूमिका घेतली . सभागृहाच्या पायऱ्यावर बसून काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सरकारच्या आमदारांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली .

# धानोरे येथील सैन्य दलातील जवानाचा अपघाती मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** निफाड तालुक्यातील धानोरे येथील रहिवासी असलेला भारतीय सैन्य दलातील जवान श्रीराम राजेंद्र गुजर ( वय - २४ ) हे सुटीवर गावी आले होते.शिर्डी येथून साईबाबाचे देवदर्शन करून सोनेवाडी ( ता.कोपरगाव जि.अहमनगर ) येथे नातेवाईकांकडून घरी येत असताना दुचाकी पल्सर गाडीचा अपघात झाला. ही घटना १६ जुलैला दुपारी ३:३० वाजताच्या सुमारास सिन्नर-शिर्डी राष्ट्रीय महामार्गावर पाथरे( ता.सिन्नर ) येथे घडली.श्रीराम यांच्या निधनामुळे गावावर शोककळा पसरली असून मंगळवारी दि.१८ रोजी सकाळी ११:०० वाजता श्रीराम यांच्यावर धानोरे येथे अंत्यसंस्कार होणार आहेत. आसाम( गुवाहाटी ) येथे भारतीय सैन्य दलात शिपाई जहाज ऑपरेटर म्हणून कर्तव्यावर होते.पंचवीस दिवसांपूर्वी सुटीवर आलेले श्रीराम राजेंद्र गुजर शिर्डी येथून देवदर्शन करून नातेवाईकांकडून घरी जाण्यासाठी निघाले होते.त्यांच्या पल्सर ( एमएच १५. एचए ९००६ ) मोटरसायकलला समोरून येणाऱ्या प्लॅटिना मोटर सायकलने जोरदार धडक दिली.या भीषण अपघातात प्लॅटिनावरील व श्रीराम गंभीर जखमी झाले.श्रीराम यांच्या सोबत असलेला मावसभाऊ अक्षय उर्फ बबलू पांडुरंग जावळे( वय २५. रा. सोनगाव,ता.कोपरगाव ) यांना जबर मार लागल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.अपघातानंतर पाथरेचे ग्रामस्थ व पिंपरवाडी टोल नाका मदत पथकाने श्रीराम व अपघातग्रस्तांना शिर्डी येथे साई संस्थांच्या सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलमध्ये दाखल केले.उपचारादम्यान रुग्णालयात त्यांची प्राणज्योत मालवली.त्यांच्या



पश्चात आजोबा संतु, आई अनिता, शेतकरी वडील राजेंद्र, भाऊ नितिन, ब हीण प्रियंका असा परिवार आहे. दरम्यान एक महिन्याच्या सुट्टीवर गावी आलेल्या श्रीराम नातेवाईकांना भेटून मंगळवार दि.१८ रोजी आपल्या कर्तव्यावर हजर होण्यासाठी जाणार होते परंतु दुर्दैवाने त्याच्या आतच काळाने घाला घातला.

शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या श्रीराम यांनी अतिशय हालकीच्या परिस्थिती आपले शिक्षण पूर्ण केले.दहावी पर्यंतचे शिक्षण रूई येथील न्यू इंग्लिश स्कुल मध्ये घेतले व नंतर बारावीचे शिक्षण विंचूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील उच्च माध्यमिक विद्यालयात पूर्ण करून सैन्यदलात भरती झाले आणि पुणे येथे सेवेला प्रारंभ झाला.श्रीराम हे भारतीय सैन्य दलात बॉम्बे इंजिनिअर कोर २३६ IWT युनिट मध्ये गेल्या सात वर्षांपासून कार्यरत होते.

# चर्चा मनोमिलनाची

आधुनिक केसरी

राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार गटाचे नेते हे आजही शरद पवार यांना भेटले. सलग दोन दिवस या सगळ्यांच्या भेटीगाठी सुरु आहेत. त्यामुळे नवे समीकरण घडणार का? याची चर्चा आता सुरु झाली आहे. प्रफुल्ल पटेल यांनीही आम्ही शरद पवार यांना समजवण्याचा प्रयत्न करतो आहोत असे सांगितले आहे. तर दुसरीकडे मंत्री दीपक केसरकर यांनी शरद पवार अजित पवार मनोमीलनाविषयी एक सूचक वक्तव्य केले आहे. अजित पवार आणि शरद पवार यांचं मनोमीलन व्हावं म्हणून आम्ही प्रार्थना करु. मी सुद्धा सुरुवात राष्ट्रवादी काँग्रेसपासूनच केली आहे. काँग्रेसमध्ये सुरुवात केली आणि मग शरद पवारांसह राष्ट्रवादीत गेलो. मला वाटतं जर शरद पवार यांच्याकडे सगळ्यांनी आग्रह धरला तर निश्चितपणे त्यांचे सगळ्यांवर प्रेम आहे. त्या प्रेमापोटी ते कदाचित तयार होऊ शकतील. मात्र इतक्या मोठ्या माणसाच्या मनात काय? हे सांगता येत नाही असे दीपक केसरकर यांनी म्हटले आहे. शरद पवार यांच्या अनुभवाचा फायदा हा महाराष्ट्राला झाला पाहिजे इतकीच आमची इच्छा आहे. मात्र आम्ही त्यांच्याशी याविषयी चर्चा करु शकत नाही. ते स्वतः सत्तेवरही होते. त्यांना हे ठाऊक आहे की सत्तेवर असताना जी कामं होतात ती विरोधात असताना होत नाहीत. त्यामुळे त्यांनी योग्य निर्णय घ्यावा एवढी आमची अपेक्षा आहे. असंही दीपक केसरकर यांनी म्हटले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये शरद पवार व अजित पवार असे दोन गट पडले असून त्यानुसार दोन प्रतोद, दोन विधिमंडळ गटनेते आणि इतर पदाधिकाऱ्यांची नियुक्ती दोन्ही गटांकडून करण्यात आली आहे. त्यामुळे ठाकरे गट व शिंदे गटाप्रमाणेच सध्या राष्ट्रवादी काँग्रेसची स्थिती झाली आहे. त्यामुळे सोमवार अर्थात आजपासून सुरू झालेल्या पावसाळी अधिवेशनात नेमकं काय चित्र दिसणार? याविषयी तर्क-वितर्कांना उधाण आलं होतं. त्यात अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व मंत्र्यांनी रविवारी दुपारी वाय. बी. चव्हाण सेंटरवर शरद पवारांची भेट घेतली आणि अनेकांच्या भुवया उंचावल्या! आज अजित पवारांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटातील आमदारांनी वाय. बी. चव्हाण सेंटरवर भेट घेतली. यावेळी कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल व सुनील तटकरेही उपस्थित होते. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नेमकं काय चाललंय? यासंदर्भात तर्क-वितर्कांना उधाण आलं आहे. जवळपास दीड तास चाललेल्या या बैठकीनंतर कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी यासंदर्भात माध्यमांना माहिती दिली. आज अजित पवार व विधिमंडळाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार शरद पवारांचा आशीर्वाद घेण्यासाठी वाय बी चव्हाण सेंटरला आले होते. आम्ही सगळे इथे आलो. काल अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली काम करणारे सर्व मंत्री, विधानसभा उपाध्यक्ष व ज्येष्ठ नेते सुनील तटकरे आणि मी इथे आलो होतो. काल रविवार असल्यामुळे आमदार आपापल्या मतदारसंघात होते. आज विधिमंडळाचे अधिवेशन चालू झाल्यामुळे बरेच आमदार आज इथे हजर होते. त्यामुळे आमदारांना शरद पवारांचा आशीर्वाद घेण्याची संधी मिळावी यासाठी आम्ही इथे आलो, असे प्रफुल्ल पटेल म्हणाले.

# अण्णा भाऊ साठे यांचे सामाजिक विचार



शरद ठाकर
संपर्क क्र. ८२७५३३६६७५

आधुनिक केसरी

**अण्णा भाऊ साठे यांनी कथा,पोवाडे, लावण्या, शेतकरी गीते, मजूर गीते,छक्कड, गण, पदे,लोकनाट्य, प्रवास वर्णन अशा विविध वांङ्मय प्रकारातून लेखन केलेले आहे. त्यांच्या विविध लेखन प्रकारातील त्यांच्या निवडक कथा लेखनातून अण्णाभाऊंचा सामाजिक विचार कशा पद्धतीने दिसून येतो. हे या लेखातून मांडलेले आहे. अण्णा भाऊंनी आपल्या विविध पुस्तकांना प्रस्तावना लिहिल्या आहेत त्या प्रस्तावित स्वरूपाच्या आहेत. कमीत कमी शब्दात जास्तीत जास्त आशय कसा ठासून भरवा याचा या प्रस्तावना आदर्श नमुना आहेत. सर्वांमधून अण्णा भाऊंची जीवनदृष्टी,सामाजिक विचार आणि वांङ्मयीन दृष्टिकोन आपल्याला दिसून येतो.**

अण्णा भाऊंनी स्विकारलेला सामाजिक विचार आणि अंगिकारलेली जीवनदृष्टी ही जागतिक पातळीवर सिद्ध झालेली समाज परिवर्तनाची एक मूलभूत दृष्टी आहे."मार्क्सवादी साहित्यविचार" ही ती दृष्टी आहे.

अण्णा भाऊंनी साहित्यलेखन करत असताना काही जीवनमूल्य मांडलेले आहेत. कुणी काही म्हटले, मानले तरी अण्णा भाऊंनी आपली सामाजिक मूल्ये, जीवन मूल्ये सोडलेले नाहीत. त्यांनी त्यांच्या विविध कथांमधून स्वाभिमान आणि मानवाची प्रतिष्ठा याबाबत तडजोड केलेली नाही; कारण कोणाचाही स्वाभिमान दुखावला तर तो समाजात ताठ मानेने जगू शकत नाही; म्हणून अण्णा भाऊ व्यक्तीचा विकास पहात नाहीत तर ते समाजाच्या विकासाकडे लक्ष देऊन राहतात. व्यक्तीरूप नव्हे तर समष्टिरूपात ते साऱ्यांचा विकास पाहतात. कारण समाजाच्या विकासात व्यक्तीचा विकास होत असतो आणि व्यक्तीचा विकास म्हणजे समाजाचा विकास हे सूत्र अण्णाभाऊंना माहीत होते. व्यक्ती व्यक्तींचा मिळून समाज निर्माण होतो आणि तो समाज सामाजिक विचार करणारा बनावा यासाठी त्यांनी त्यांच्या साहित्यामधील एकही पात्र असे नाही की जे दुर्गूणी बनले आहे. उलट दुर्गूणी पात्रे सदगूणी बनावीत आणि समाजाला उपयोगी ठरावीत असाच प्रयत्न त्यांनी केलेला आहे. कोणत्याही लेखकाचे साहित्य हे व्यक्तीच्या, समाजाच्या विकासासाठी निर्माण झालेली असते. आपल्या साहित्यातून आदर्श समाज घडवण्यासाठीच लेखक साहित्य निर्माण करत असतो; म्हणून कोणताही समीक्षक साहित्याचा अभ्यास करताना सामाजिक संदर्भ टाळू शकत नाहीत. अण्णाभाऊंच्या पुढील निवडक कथांमधून आपल्याला त्यांचा सामाजिक विचारच दिसून येणार आहे.

**बरबाद्या कंजारी:** बरबाद्या कंजारी या आपल्या पहिल्या कथासंग्रहाच्या प्रस्तावनेत अण्णा भाऊंनी लिहिले आहे. "माझी जीवनावर फार निष्ठा असून मला माणसं फार आवडतात. त्यांची श्रमशक्ती महान आहे. ती जगतात.जगाला जगवतात. त्यांच्या बळावरच हे जग चालतं.त्यांची झुंज आणि त्यांचे यश यावर माझा विश्वास आहे. त्यांना विद्रूप करणे मात्र मला आवडत नाही. नव्हे मला भीती वाटते. माणसांना वैफल्याच्या नावाखाली विद्रूप करू नये असं माझं मत आहे. वैफले हे तलवारी वरच्या धुळी सारख असतं ती धूळ झटकून तलवार लखलखीत करता येते.मी जीवन जगतो, पाहतो, अनुभवतो तेच मी लिहितो.मला कल्पनेचे पंख लावून भरारी मारता येत नाही. त्याबाबतीत मी स्वतःला बेडूक समजतो."

प्रस्तावनेतील या विचारावरूनच आपल्याला सामाजिक विचारच दिसून येतो. बरबाद्या कंजारी कथेतील बरबाद्या लोकांच्या कानातील मळ काढण्याचे काम करतो. पण तो चोरी किंवा इतर वाईट काम न करता इमानाने कानातला मूळ काढण्याचं काम करतो. 'बैमानी तर करत नाही ना' असे म्हटले आहे. म्हणजे बरबाद्या कंजारी ची प्रस्तावना आणि या कथेतील अशया वरून अण्णाभाऊंचा सामाजिक दृष्टिकोनच दिसून येतो.

**सापळा:** या कथेतून अण्णा भाऊ साठे यांनी समाजामध्ये जी वेगवेगळ्या बाबतीत दरी असते. गरीब-श्रीमंत, उच्च- नीच, कामगार-मालक ही सामाजिक दरी दूर करण्यासाठी नायक हरिबाहा या कथेतील जो पुढारी आहे. तो पाटील असून त्याने कुठेही, कसेही वागले,गुन्हा केला तरी त्याला कोणी काही बोलू शकत नाही अशा पद्धतीची परिस्थिती असताना. हरिबाने लिलावात घेतलेल्या पळसाच्या माळावर पाटलाची गुरं चरतात;



म्हणून हरीबा पाटलाची गुर चावडीवर घेऊन येतो आणि पाटलाला कोंडवाड्याची चावी मागतो. तेव्हा पाटील त्याला चावी कशाला पाहिजे विचारतात. तेव्हा तो नघाबरता तुमची गुरं कोंडवाड्यात घालायचे आहेत म्हणतो. तेव्हा पाटील हरिबाला रागावतो; परंतु पाटील हरीबाला 'तु हे काय करत आहे ह्याची तुला जाणीव आहे काय ?' असे विचारतो तेव्हा 'तुम्ही जे केलं तेच मी करत आहे.' असे ठणकावून सांगतो म्हणजेच या कथेतून आण्णाभाऊ साठे आपल्याला सामाजिक विचारच देतात. कारण गुन्हा करणारा हा कोणी का असेना तो गुन्हेगार असतो; पण हे बोलण्याची हिंमत हा गावातील महार समाजातील हरिबा करतो त्यातून आपल्याला समाजातील जी विषमतेची दरी आहे ती कमी करण्याचे कामच या कथेच्या माध्यमातून अण्णाभाऊ साठे करण्याचा प्रयत्न करताना दिसून येतात.

अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या प्रत्येक कथेतून सामाजिक, नैतिक, आदर्श मूल्य पेरण्याचे काम केलेले आहे. तसेच या कथेतून भोमक्या हा कामासाठी नागपूर पासून मुंबई पर्यंत फिरतो पण त्याला काम मिळत नाही. मग तो भीक मागून जगत असतो. भीक मागून जगतांना त्याला गावातील बाया-माणसं म्हणत असतात. 'ए तुला हात पाय नाहीत ? झोकात कपडे करून भीक मागतोस ?जा पुढे.' त्याला चांगले कपडे करून राहिला तर कोणी भीक देत नाही आणि भीक नाही मिळाली तर उपाशी राहावं लागतं. म्हणून तो शेवटी कपडे कसलेही असले तरी आपल्याला पोटाला काही मिळाले पाहिजे म्हणून तो कसेही कपडे करून भीक मागत जगतो; परंतु पुढे त्याला लक्षात येते,की आपण ताऱ्या वाजवून जसे येईल,जे येईल ते गाऊन लोकांकडून मागून खावं. या कृतीतून आपल्याला भोमक्याचा स्वाभिमानच दिसून येतो. समाजातील प्रत्येक व्यक्ती ही स्वाभिमानी बनली पाहिजे, अशा प्रकारची दृष्टी अण्णाभाऊंची होती.या कथेतून हा सामाजिक विचारच आपल्याला दिसून येतो.

बाबालाल आणि सुकर्णा हे दोन व्यक्ती रेडं झुंज या कथेत रेड्यांच्या झुंजी लावतात आणि रेड्यांच्या झुंजीत रेडे मेले तरी हरकत नाही,परंतु झुंजीत आपल्याच रेड्याचा विजय झाला पाहिजे अशी वृत्ती या दोघांचीही असते.

"आक्रमक वृत्ती ही सर्व प्राण्यात असते पण त्याचबरोबर पराजया पदरी घेण्याचा,कबूल करण्याचा किंवा माघार घेण्याचा प्रामाणिकपणाही त्यांच्यात असतो;परंतु दोनच जाती अशा आहेत, की त्या पराजय कबूल करीत नाहीत,की माघारही घेत नाहीत.त्या म्हणजे माणसात स्पर्धेने पिसाट झालेले भांडवलदार आणि पशुत उन्मत्त झालेले रेडे.त्यांना पराजय नी माघार कबूल नसते निःपातच मान्य असतो.

या कथेतून त्यांनी माणूस कशा वृत्तीचा असतो हे सांगितले आहे.माणसाने पराजय स्वीकारायला शिकले पाहिजे.समाजामध्ये आपल्याला राहायचे तर आपण जय पराजया पेक्षा माणुसकी महत्त्वाची आहे.तरच समाजाची प्रगती होऊ शकते हा सामाजिक विचार ते या कथेतून देतात.

अण्णाभाऊ साठे यांनी जे साहित्य लेखन केले आहे. त्या साहित्यातून त्यांनी सामाजिक विचार देण्याची काम केलेले आहे.साहित्यातील सामाजिक विचार हे जगाने मान्य केलेले आहेत.त्यांच्या प्रत्येक कथेतून सामाजिक विचार व्यक्त झालेला दिसतो. वरील ज्या काही निवडक कथांमधील आशय पाहिला तर आपल्याला त्यातून अण्णाभाऊ साठे यांनी सामाजिक जडण घडणीसाठी कशा पद्धतीने आपल्या कथांमधून सामाजिक विचार पेरलेले आहेत हेच दिसून येते. अण्णा भाऊ साठे यांच्या स्मृती दिनानिमित्त विनम्र अभिवादन.

# जीवनाची अवस्था ही ज्ञान स्थितीवर अवलंबून असते



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**वेळ काळ परस्थिती स्थिती कोणतीही असो परिपुर्ण ज्ञान हेच जीवनातील सर्व दुःखावर गुणकारी औषध ठरत .आपल्याला मिळालेला मनुष्य देह हा काही फक्त सुखाचा उपभोग घेण्यासाठी झालेला नसुन बहुतांश दुःख पण निश्चित वाट्याला येणार आहेत याची जाणीव ठेवून ज्या पद्धतीच दुःख आहे .त्या पद्धतीचे उच्च ज्ञान आपल्या कड असलं पाहिजे जेणेकरून दुःख आल तरी ते आपल्या जीवनावर प्रभाव निर्माण करू शकलं नाही पाहिजे तेव्हाच ते ज्ञान आपल्यासाठी उपयोगी ठरत. परिपुर्ण ज्ञान हेच सर्व दुःखावर प्रभावी गुणकारी औषध आहे ज्याचा वापर आपण आपलं जीवन स्थिर ठेवण्यासाठी करू शकतो. आपण ज्या बाबीला सुख समजतो त्याच बाबी दुःखाचं मुळ ठरतात.**

आपण आपल्या ज्ञान उंचीनुसार सुख दुःख ठरवतो .पण वास्तविक सत्य काय आहे हे आपण जाणून घेत नाहीत. सत्य जाणून घेण्यासाठी आपल्या कड मजबूत अस प्रभावी ज्ञान असलं पाहिजे. ज्ञान अवस्था असेल तर दुःख आपल स्थान आपल्या जीवनात निर्माण करू शकत नाहीत. ज्ञान उंची कायम ठेवली तर सदैव आपली अवस्था स्थिर राहते. मुळात अवस्था म्हणजे काय ? तर अवस्था म्हणजे दशा अथवा हालत एकंदरीत जीवनाच मूल्यमापन काढलं तर जीवन स्थिती निश्चित होते आणि ही स्थिती अवस्था हि आपल्या ज्ञान, अज्ञानावर ठरत असते. आपल्या जीवनात निर्माण होणारी स्थिरता अस्थिरता सुख दुःख हे आपल्या ज्ञान स्थितीवरच अवलंबून असते. परीपूर्ण ज्ञान दुःख मुक्त जीवन अर्धवट ज्ञान असेल तर अस्थिर दुःखी जीवन मग जीवनात नेमकं मिळविण्या सारखं काही असेल तर पूर्ण ज्ञान हेच जीवनासाठी हितार्थ ठरत. मानवी जीवन हे क्षणभंगूर असलं तरीही जो पर्यंत जीवन आहे तो पर्यंत जीवनचक्र चालू असत. मग जीवन चक्र आलं कि त्या सोबत आकांक्षा महत्वाकांक्षा, मोह, माया ,स्वार्थ, हे सगळं आलंच. या सगळ्या सोबत दुःख हे आलंच मग या दुःखाच्या चक्रव्युहातुन कायमची मुक्ती मिळविण्यासाठी पुर्ण ज्ञान आवश्यक असतं .तसं पाहिलं तर जीवनाची स्थिती हि फक्त ज्ञानानुसारच निश्चित होत असते. आपण समस्येला घाबरत असतो. पण समस्या हि कधीच मोठी नसते. उपाय माहित नसतो म्हणून समस्या हिच खुप मोठी अडचण भासते. समस्या अडचण या सोबत खेळत बसण्यापेक्षा उपया शोधुन मार्गक्रमण करण हे कधीही हितकारक ठरत. जीवनातील सुख दुःखाची निर्मिती ही ज्ञान आणि अज्ञानावर अवलंबून असते. या गुह्य ज्ञानापासून आपण वंचित असल्या कारणाने सुख दुःखाच्या फेरयात आपण सहजपणे अडकतो.जीवन म्हटलं कि समस्यांचा महासागर आणि महासागरात तरूण जाण्यासाठी ज्ञान हेच उपयुक्त प्रभावी असं माध्यम आहे. जीवनात समस्या अडचणी दुःख अनंत आहेत पण त्या अनुषंगाने असणारे



पुर्ण ज्ञान हेच त्यावरील उपयुक्त प्रभावी औषध आहे. परीपूर्ण ज्ञान हे जीवनातील सर्व दुःख संपवून समाधान स्थिरता निर्माण करते. तर अर्धवट ज्ञान हे जीवनातील सर्वात घातक ठरत. अस्थिरता निर्माण करत म्हणून जीवनाची दिशा आणि दशा हि सर्वस्वी आपल्या ज्ञानावर अवलंबून असते. आपलं जीवन कसं आहे हे आपल्या ज्ञान स्थिती वर आधारित असल्याने जीवनातील स्थिती बदलण्यासाठी आवश्यक ज्ञान अर्जित करणं गरजेचं आहे.तस पाहिलं तर सृष्टी वर उपलब्ध ज्ञान हे अनंत आहे त्या पैकी आपण जितकं जास्ती जास्त ज्ञान गृहण करू शकू तितकंच आपली वैचारिक स्थिती मजबूत होणार हे निश्चित आहे.जीवनाशी निगडित विषय अनेक आहेत त्या अनेक विषयांपैकी आपण ज्या क्षेत्राशी निगडीत आहेत त्यामधील संपुर्ण ज्ञान आपल्याला असेल अथवा एकंदरीत जीवनाविषयीच जरी संपूर्ण ज्ञान आपल्याकडं असलं तरी कसलंच दुःख आपल्या जीवनात प्रवेश करत नाही. त्याच प्रमाणे आपल्याकडं निव्वळ ज्ञान नसेल तरीही फार काही उल्लेखनीय फरक पडत नाही पण एदाकदाचित आपण अर्धवट ज्ञानी असु तर मग मात्र आपली खैर नाही कारणं अर्धवट ज्ञान हे नेहमी घातक ठरत.विघातक असतं तसं पाहिलं मानवी आयुष्य हे दोन स्थिती मध्ये विभागलेल असतं. स्थिरता आणि अस्थिरता ह्या जीवनातील प्रमुख स्थिती असल्याने संबंध जीवन हे फक्त स्थिरता आणि अस्थिरता या भौति फिरत असल तरी या स्थितीला प्रमुख कारणही ज्ञान हेच असल्याने ज्ञान स्थिती वर जीवन स्थिती आधारित असते.मानवी जीवन हेच वास्तविक समस्यांच माहेर घर आहे जीवनात दुःख हे कोणालाच नको आहे सुख हे प्रत्येकाला अपेक्षित आहेच .तसं पाहिलं तर मानवी जीवन ही अद्भुत घटना आहे. इथ आपण साक्षीदार होण्यासाठी अथवा साक्षीभाव अनुभव घेऊन कर्म फल सोबत घेऊन जाण्यासाठी आलो आहोत मुळात येण्याचं प्रयोजन माहित नसल्याकारणाने मुख्य अडचण निर्माण होते.

**(चिारवंत, साहित्यिक, लेखक, आध्यत्मिक मार्गदर्शक तथा संस्थापक अध्यक्ष वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्य 9011634301)**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# शासकीय अधिस्वीकृती समितीवर बेकायदेशीर नियुक्त्या

## सोयगाव येथे पत्रकारांचे ठिय्या आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** राज्य शासनाने गठीत केलेल्या शासकीय पत्रकार अधिस्वीकृती समितीत सर्व नियमबाह्य सेवाभावी संस्थेला संघटना समजून त्यांच्या प्रतिनिधींना एकतर्फी नियुक्ती केल्या आहे. पत्रकार अधिस्वीकृती समितीमध्ये संघटनेच्या पदाधिकारी पत्रकारांना न घेता सेवा संस्था अंतर्गत नोंदणी असलेल्या तसेच न्यायप्रविष्ठ असलेल्या सेवा संस्थेतील पदाधिकारी असलेल्या पत्रकारांचा समावेश केलाआहे. शासनाने ही समिती बरखास्त करण्याचत यावी या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघातर्फे सोयगाव तहसील कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करीत नायब तहसीलदार नाना मोरे यांना सोमवारी (दी.१७) निवेदन देण्यात आले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे, प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे, प्रदेश संघटक संजयजी भोकरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण महाराष्ट्रात पत्रकार संघाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय,जिल्हा माहिती अधिकारी यांना निवेदन जिल्हा माहिती व तहसील कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले. सोयगाव येथे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघातर्फे सोयगाव तहसील कार्यालयासमोर तालुका अध्यक्ष भरत पगारे यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी पत्रकारांनी ठिय्या आंदोलन करीत नायब तहसीलदार नाना मोरे यांना निवेदन दिले. यावेळी नायब तहसीलदार नाना मोरे यांनी आपल्या भावना



शासनस्तरावर कळविण्यात येणार असल्याचे आश्वासन दिले. यावेळी पत्रकार रवींद्र काटोले, विजय काळे, शेख गुलाब, यासिन बेग, दिलीप देसाई, राधेश्याम जाधव, संभाजी पवार, दत्तात्रय काटोले, शेख सुलेमान, राजू दुतोंडे व सावळदबारा परिसरातील पत्रकार बांधव तालुका उपाध्यक्ष दिनेश चोपडे, सुनील चव्हाण, जेष्ठ पत्रकार गोकुळसिंग राजपूत आदी पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अमृत महोत्सवनिमित्त स्वातंत्र्यसेनानी कुटुंबाचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** मराठवाडा स्वातंत्र्यसंग्राम मधील स्वातंत्र्य सेनानी स्वर्गवासी काशिनाथ तुळशीराम वराडे यांच्या धर्मपत्नी पार्वतीबाई काशिनाथ वराडे यांचा आजादी का अमृत महोत्सव हे वर्ष साजरे करताना भारतीय स्टेट बँक शाखा परतूरच्या वतीने शाल श्रीफळ भेटवस्तू देऊन सत्कार दि १५ जुलै २०२३ रोजी करण्यात आला. यावेळी भारतीय स्टेट बँकचे मुख्य प्रबंधक अतुल सावजी, उप प्रबंधक मनोहर गावडे, कर्मचारी इमरान खान, प्रवीण दुधाट, आदर्श ताम्हणे, मनीषा कांबळे, प्रतिष्ठित नागरिक गंगाधर पवार, यांची उपस्थिती होती. यावेळी मुख्य प्रबंधक अतुल सावजी यांनी आजच्या तरुण पिढीला स्वातंत्र्य सैनिकाचे महत्त्व त्यांनी समाजासाठी केलेला त्याग व त्यांच्या या अथक परिश्रमामार्फत मिळालेले स्वातंत्र्य भावी पिढीला कळावं. त्या पिढीचा स्वातंत्र्य सेनानी कुटुंबाचा विसर समाजाला पडलेला चाललेला दिसत आहे. तो पडू नये यासाठी हा नवीन उपक्रम स्टेट बँकेच्या वतीने आयोजित करण्यात आला. तसेच बँकेच्या ग्राहकासोबत असलेले संबंध आणखीन सुदृढ व्हावे यासाठी भारतीय स्टेट बँके येणाऱ्या काळात नवीन प्रकारचे उपक्रम भारतीय स्टेट बँकेकडून राबवले जातील असा विश्वास अतुल सावजी यांनी कार्यक्रमाच्या निमित्ताने व्यक्त केला. भारतीय स्टेट बँके ग्राहकांसाठी राबवत असलेल्या उपक्रमाचे नागरिकांनी कौतुक केले.

# अंगणवाडी कार्यकर्तीस सरपंचांनी दिला इशारा

## साधना बैरागी मारतात नेहमी दांड्या; विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील चिकलठाण येथील अंगणवाडीस सरपंच शिवाजी धनेधर यांनी अचानक भेट दिली. यावेळी अंगणवाडी कार्यकर्ती साधना बैरागी या उशिरा आल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. कन्नड तालुक्यील चिकलठाण येथे एकूण 13 छोट्या मोठ्या अंगणवाड्या आहेत. त्यातील एका अंगणवाडीत साधना रामदास बैरागी कार्यरत आहेत. त्या वेळेवर कामावर येत नाहीत, बैरागी तात्पुरता कोणाला तरी पदभार देऊन नेहमी औरंगाबाद येथे मुलाकडे असतात.

तसेच पोषण आहारातही अफरातफर करतात, अशा तक्रारी ग्रामस्थांकडून वारंवार केल्या जात आहेत. त्यामुळेच सरपंच शिवाजी धनेधर यांनी आपल्या सहकाऱ्यांसह अंगणवाडीला भेट दिली असता बैरागी कामावर आलेल्याच नव्हत्या. बऱ्याच वेळानंतर त्या हजर झाल्या. यावेळी सरपंचांनी त्यांच्याकडून कामकाजाची विचारपूस केली.

> चिकलठाण येथील साधना बैरागी या नेहमी दांड्या मारतात. तसेच धान्यसुध्दा घेऊन जातात, अशा तक्रारी मला प्राप्त झाल्या. म्हणून मी व माझे सहकारी अंगणवाडी येथे गेलो असता त्या हजर नव्हत्या. त्या उशीरा आल्या. अंगणवाडीत वेळेवर हजर रहा, अन्यथा वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार करू योग्य ती कारवाई करू असा इशारा दिला.
>
> 
>
> **शिवाजी धनेधर, सरपंच**

तसेच सतत दांड्या मारणाऱ्या बैरागी यांना सरपंच व ग्रामपंचायत सदस्यांनी चांगलीच समज दिली. त्यांच्या या बेजबाबदारपणामुळे शासनाची व गरीब मुलांची फसवणुक होत आहे. याकडे एकात्मीक बालविकास सेवा योजनेचे वरिष्ठ अधिकारी लक्ष देणार का ? अशी चर्चा आता ग्रामस्थांमध्ये जोर धरू लागली आहे. संबंधित विभागाने या गंभीर बाबीकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे, अन्यथा मोठे अंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.



# शेतकरी संघटनेचे नेते प्रल्हाद कराड यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर जनजागृती आणि आंदोलनांच्या मार्गाने एकेकाळी शरद जोशी यांच्यासमवेत झंझावात निर्माण करणारे शेतकरी संघटनेचे ज्येष्ठ नेते आणि निफाड सहकारी साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष प्रल्हाद पाटील कराड (९४) यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. १९८० मध्ये शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली ऊस आणि कांदा प्रश्नांवर नाशिकमध्ये आंदोलन झाले होते. त्यात शेतकऱ्यांना उत्स्फुर्तपणे सहभागी करण्यात कराड यांचे महत्वाचे योगदान होते.

कराड हे काही दिवसांपासून येथील एका खासगी रुग्णालयात उपचार घेत होते. रविवारी दुपारी त्यांचे निधन झाले. राष्ट्र सेवा दलाच्या विचार प्रणालीने कार्यरत राहिलेल्या कराड यांनी अडीच दशके समाजवादी पक्षात काम केले. शेतीत नवनवीन प्रयोग केले. ऊस आणि कांद्याला अतिशय कमी भाव मिळत असल्याने त्याची कारणमिंमासा करण्यासाठी प्रल्हाद कराड, माधवराव मोरे यांनी शरद जोशी यांना निफाडमध्ये निमंत्रित केले.

# 'अहिरे'चा माझी वसुंधरा अभियानात नववा क्रमांक

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** अहिरे, ता.खंडाळा येथील ग्रामपंचायतीने माझी वसुंधरा अभियानात सातारा जिल्ह्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ या कालावधीत हे अभियान राबवण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व हवामान बदल विभागांतर्गत पर्यावरणाच्या संवर्धनासाठी निसर्गातील पृथ्वी, वायु,जल, अग्नी व आकाश या पंचतत्त्वावर आधारित माझी वसुंधरा अभियान हा कृतिशील उपक्रम दरवर्षी राबविण्यात येतो. अभियानाचे यंदाचे हे तिसरे वर्ष असून नुकताच या अभियानाचा निकाल जाहीर झाला. अहिरे ग्रामपंचायतीने ३१०३ गुण मिळवून सातारा जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला असून पुणे विभागात पाचवा तर महाराष्ट्र राज्यात नववा क्रमांक पटकावला आहे.गावचे सरपंच प्रा.रविंद्र सोनवणे यांनी विशेष प्रयत्न केले असून उपसरपंच स्नेहा मोहिते, ग्रामपंचायत सदस्य दयानंद धायगुडे, साधना धायगुडे,रूपाली जाधव, प्रवीण चौरे, शिवाजी धायगुडे,राणी धायगुडे, शकुंतला धायगुडे तसेच ग्रामसेवक दीपक सोनवणे व सायली पिसाळ यांनी मोलाचे सहकार्य केले.अहिरे ग्रामपंचायतीला मिळालेल्या या महत्वपूर्ण यशाबद्दल ग्रामपंचायतीचे विशेष कौतुक केले जात आहे. विधान परिषदेचे माजी सभापती श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर व वाई, खंडाळा, महाबळेश्वरचे आमदार मकरंद पाटील, खंडाळा पंचायत समितीचे माजी सभापती व खंडाळा शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे संचालक रमेश धायगुडे,सद्गुरू कृपा डेव्हलपर्सचे चेअरमन नितीन ओहाळ, युवा नेते ऋषिकेश धायगुडे तसेच पंचायत समिती खंडाळाचे गट विकास अधिकारी अनिल वाघमारे व विस्तार अधिकारी भोईटे व बोडरे यांनी अभिनंदन केले. वृक्षारोपण, वारसा वृक्ष,रोपवाटिका, जैवविविधता अहवाल, हरित क्षेत्राची देखभाल, घनकचरा व्यवस्थापन, सेंद्रिय खत निर्मिती प्रकल्प,हरित सन साजरे करणे, सायकल ट्रॅक,पाणलोट विकास उपक्रम, जलसंधारण व जलसंवर्धन,छतावरील पाण्याचे पुनर्भरण, शोष खड्डे, नाडेफ खड्डे, जलस्त्रोत पुनर्जीवन व सुशोभीकरण, बायोगॅसचा वापर इको फ्रेंडली व जनजागृतीपर उपक्रम, अपारंपारिक ऊर्जा स्रोताच्या वापरास प्रोत्साहन, सौरदिवे, एलईडीचा वापर, सोलर हिटर, सौर पंप, सॅनिटरी पॅड वेंडिंग व डिस्पोजल मशीनचा वापर यासारखे अनेक उपक्रम अहिरे ग्रामपंचायतीकडून राबवण्यात आले.




नक्षत्रवाडी, छत्रपती संभाजीनगर, (महाराष्ट्र) येथील गट क्र. 8/1, समर्थ एलक्लेव्हमध्ये पहिल्या मजल्यावरील 2 बीएचके फ्लॅट अर्जंट विकणे आहे. एकूण क्षेत्रफळ 910 स्क्वेअर फूट, क्लिअर टायटल, सीएसएमएसएस कॉलेजपासून पाच ते सात मिनिटांच्या अंतरावर, रम्य वातावरणात, मेन रोडच्या अगदी जवळ.

संपर्क : मो. 7588818406

महाराष्ट्र Business Katta









# चला आपण देश मजबूत करू....



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**भारत देशाला खुप महत्त्वाचा इतिहास लाभलेला आहे. सामाजिक व राजकीय अशा दोन्ही प्रकारच्या जिवनासाठी येथे संघर्ष करावा लागला तेव्हा कुठे आपल्याला हक्काचे सामाजिक व राजकीय वर्चस्व प्राप्त झाले. भारत हा हजारो वर्षांपासून परकियांच्या गुलामगिरी मध्ये होता. आणि भारतीय लोक धर्म संस्कृतीच्या नावाखाली धार्मिक ग्रंथाचे गुलाम होते. म्हणजेच भारतीय लोक दुहेरी गुलामगिरी मध्ये जिवन जगत होते एक म्हणजे विदेशी राज्यकर्त्यांची गुलामगिरी व दुसरी म्हणजे धर्माच्या नावाखाली लादलेली माणसिक गुलामी. या दोन्ही गुलामी मधून कायमचे बाहेर येणे आवश्यक होते. परकियांची गुलामगिरी आपण लढ्याया करून, युद्ध करून त्यांचा पराभव करून जिंकु शकलो. परंतु मानसिक गुलामी हि शारीरिक व राजकीय गुलामीपेक्षा खुपच घातक आहे.**

मानसिक गुलामांना सत्य, विज्ञान, स्वहीत, राष्ट्रहीत ह्या गोष्टिबद्दल आपुलकी व प्रेम नसुन विशिष्ट वस्तु व्यक्ती वा संकल्पना याबद्दल प्रचंड आस्था व प्रेम असते. ही मानसिक गुलामी तोडून विज्ञानवाद, तर्कवाद प्रबोधनाच्या माध्यमातून लोकांना देऊन शिक्षणाचे महत्त्व लोकांना पटवून दिले. संतानी आपल्या प्रबोधनात शिक्षण, एकी, समता, व राष्ट्रहीत यावरच भर दिला. परंतु आजही लोक पाहिजे तसे तर्कवादी व विज्ञानवादी झाले नाही. विदेशी राजकीय लोकांनी भारताची लुट केली आणि भारताला गरिब बनवले. ब्रिटीशांनी तर व्यापार सुरू करून भारताला लुटण्याचे काम केले. परंतु त्याबदल्यात त्यांनी रेल्वे, शिक्षण, नोकरी, मोठमोठ्या इमारती, पुल, शिस्त, प्रशासन अशा बऱ्याच गोष्टी दिल्या तरीही ते परकीय आहेत आणि त्यांनी सुखसुविधा दिल्या तरीही देशाची लुट होत आहे आणि देशात परिकीयांचे राज्य आहे ही अनेक राष्ट्रभक्तांना खटकत होती. म्हणुन इंग्रजांच्या या कचाट्यातून देशाला स्वातंत्र्य मिळावे आणि सामाजिक व राजकीय सत्ता भारतीय लोकांच्या हाती रहावी म्हणून भगतसिंग, सुखदेव, राजगुरू सारख्या तरुणांनी जिवाची व जवाणीची पर्वा न कसता इंग्रजांविरुद्ध आवाज उठवला. देशाच्या हितासाठी फासावर गेले. अशपाकुल्ला खान यांचे योगदान आणि हिंमत देश विसरू शकत नाही. रक्ताच्या मोबदल्यात तुम्हाला स्वातंत्र्य देतो म्हणणारे सुभाषचंद्र भोस उच्च विद्याविभूषित होते. अशा अनेक क्रांतीकारकांनी ब्रिटीशांच्या जुलमी राजवटी विरूद्ध जाऊन देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. देश रक्ताच्या सड्याने व प्रामाणिक प्रयत्नाने धन्य होऊन स्वतंत्र झाला आणि क्रांतीकारकांच्या त्यागाला सोन्यापेक्षा जास्त किंमत प्राप्त झाली. देशाला बाहेरील शक्तीपासुन तर स्वातंत्र्य मिळाले परंतु स्वातंत्र्यानंतर देश पुन्हा धर्मांध लोकांच्या हातात जाऊन येथे सामाजिक, वंशिक, जातीय विषमता कायम राहु नाही म्हणून संविधान तयार करण्याची जबाबदारी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कडे आली म्हणून त्यांनी हजारो वर्षापासून ची मानसिक गुलामी दुर करून सर्वांना समान हक्क अधिकार दिले. प्रत्येक माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार बहाल करून, सर्वांना सत्ता व संपती मध्ये समान संधी निर्माण करून देऊन देशाला विविधतेमध्ये एकतेत बांधुन देशाला मजबूत केले. आणि देशाची सत्ता लोकांच्या हाती देऊन लोकांना देशाचा मालक बनवले. सध्याची राजकीय पाहता परकीय शत्रुपेक्षाही जास्त लुट सरकार करत असून मोबदल्यात काहीच देत नाही. धार्मिक दंगली घडवून धार्मिक द्वेष पसरवण्याचे काम सुरू आहे. देशासाठी योगदान दिलेल्या क्रांतीकारकांना बाजूला सारून, त्यांच्या विचारांना बाजुला सारून येथे धार्मिक कट्टरता पेरून देशाचे वातावरण दुषीत करण्यात येत आहेत. ब्रिटीशांकडून स्वातंत्र्य मिळण्यासाठी हिंदु मुस्लिमांनी कोणताही भेद, कोणताही द्वेष न करता हातात हात घेऊन लढा दिला परंतु आजचे राजकारणी हिंदू मुस्लिम वाद पेटवून सत्तेची पोळी स्वहीतासाठी भाजत आहेत. लोकांच्या हक्क अधिकारावर बंधने घालून लोकांचा आवाज दाबल्या जात आहे. एकंदरीत देशाची परिस्थिती पाहली तर देश हुकुमशाही कडे वाटचाल करत आहे. शिक्षण, रोजगार, आरोग्य यावरचा शासकीय खर्च कमी झाला, पैसा नाही म्हणून परकीय शिष्यवृत्ती कमी केली, पैसा नाही म्हणून नोकरभरती कमी केली, पैसा नाही म्हणून पेन्शन बंद केले, पैसा नाही म्हणून शासकीय मालमत्ता विकल्या, पैसा नाही म्हणून अनेक प्रकारचे कर लादले, पैसा नाही म्हणून विदेशी कर्ज घेतले. मग मुळात प्रश्न येतो कि कर, शासकीय संपतीची विक्री, विदेशी कर्ज हा पैसा नेमका जातो तरी कुठे. म्हणजे ब्रिटीशांपेक्षा जास्त लुट भारतीय लोकांनी देशाची केली. भारतीय लोकांच्या हक्क अधिकारावर बंधने




येत आहेत, भारतीय लोकांच्या मुलभूत समस्या वाढत आहेत, महागाई मध्ये जनता होरपळत आहे आणि सरकार मात्र आमदार खासदारांचा लिलाव करून लोकशाही ची वाट लावत आहे. राज्यकर्ते फक्त स्वतः च्या पिढ्या आर्थिक संपन्न कशा होतील यावर लक्ष देऊन देशद्रोही पणा करत आहेत. आजचा इतिहास उद्या लिहला जाईल. परंतु त्यांना त्यांच्या शी काही घेणे देणे नाही, देश व जनता नंतर अगोदर सत्ता व खुर्ची आणि त्यातून स्वहीत हेच समिकरण सध्या सुरू आहे. भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्यांना मंत्रीपद दिली जात आहेत, ईडीची चौकशी वाले सत्ताधारी पक्षात गेल्यावर चौकशी बंद होते. हे प्रामाणिक पणा नैतिकतेचे लक्षण नाही. एवढे मोठ मोठ्या भ्रष्टाचाराचे आरोप असेल भ्रष्टाचारी लोक शिष्टाचार शिकवतील आणि ते विकासाच्या गप्पा मारतील हे बुद्धीला पटणारे तरी आहे का ? हजारो करोडो रुपयाचे भ्रष्टाचार केलेले लोक प्रामाणिक व आदर्श सरकार कसे निर्माण करतील ? आणि यांनी भ्रष्टाचार केलाच नाही, तर जनतेचा पैसा खाल्लाच नाही तर यांना भ्रष्टाचारी म्हणून घेण्याची हौस आहे का ? प्रामाणिक व स्वाभिमानी लोक काहीही सहन करतात परंतु कोणाचा रुपया खाल्ला हि गोष्ट सहन होत नाही. राजकारणी तर हजारो करोडो रूपये हडप करून वरून हसतात. हा लोकांचा व जनतेचा अवमान तर आहेच परंतू नेत्यांचा स्वाभिमान कुठे आहे ? असा प्रश्न उपस्थित होतो. या सर्व गोष्टीची जाणीव अनेकांना आहे. देश संकटात सापडत आहे याविषयी अनेक लोक, सामाजिक संघटना जागृत देखील आहेत. आता फक्त गरज आहे ती जागृत, सुशिक्षित व राष्ट्रप्रेमी लोकांनी एकत्र येऊन जाती धर्माच्या भितीं तोडून, राजकीय षडयंत्र हानुन पाडून एकमेकांच्या हातात हात घेऊन आपल्याच भ्रष्ट, स्वार्थी व देशद्रोही लोकांसोबत लढण्यासाठी तयार होणे आवश्यक आहे. लोकशाही मध्ये जनताच सर्वश्रेष्ठ आहे परंतु सत्ताधारी लोक जनतेला आज काहीच समजत नाहीत, त्यांच्या हिताचे, कल्याणाचे निर्णय घेत नाही, केवळ योजना व सुविधेच्या नावावर जाहिराती करून हवा निर्माण करून देशाची तिजोरी खाली करण्याचा प्रयत्न करणे सुरु आहे. देशाला या संकटातून वाचवायचे असेल तर एकी, जागृती व सातत्य महत्त्वाचे आहे. आणि मतदारांना विश्वासात न घेता जनमताच्या विरोधात जाऊन जनतेला अपेक्षित नसलेले निर्णय व सरकार तयार करून लोकशाही ला तुडवले जाते हे सर्व थांबवायचे असेल तर एकत्र येऊन लढणे व इव्हिएम ला विरोध करणे आवश्यक आहे. इव्हिएम आहे म्हणून मताची चोरी केली जाते, निवडणूक प्रक्रिया केवळ औपचारिकता राहली आहे म्हणून लोकप्रतिनिधी जनतेचा विचार न करता जनतेला व देशाला लुटण्याचा विचार करत आहेत. शिक्षण, आरोग्य, रोजगार, महागाई याबाबत देशात नैराश्य वाढले आहे, वेगवेगळ्या कारणाने जनता खचुन गेला आहे. म्हणून आपल्याला पुन्हा देशाला मजबूत करण्यासाठी एकत्र येऊन लढा उभा करावा लागणार व इव्हिएम बाजूला करून बॅलेटवर निवडणुका झाल्या तर जनतेच्या मताला किंमत प्राप्त होऊन लोकशाही मजबूत होईल. लोकशाही मजबूत म्हणजे देश मजबूत चला देश मजबूत करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊ या..

# सुशिक्षित बेरोजगार तरुण आजही न्यायाच्या प्रतीक्षेत



संगीता ठलाल
७८२९८९६४८५

आधुनिक केसरी


**एकाच्या हाताला काम तर दुसरा काम शोधण्यासाठी वणवण भटकत फिरत आहे एक तुपाशी तर दुसरा उपाशी दिसत आहे एकजण खाऊ शकत नाही तेवढे त्याच्याजवळ भरमसाट आहे तर दुसरा एक, एक रूपया कमविण्यासाठी जिवाचे रान करत आहे आजच्या घडीला अशी भयकंर परिस्थिती निर्माण झालेली बघायला मिळत आहे या लोकांनी न्याय तरी कोणाला मागायला जावे...? वाढती बेरोजगारी अन् हाताला नीट काम न मिळाल्याने असे अनेक सुशिक्षित तरूण ,नको त्या मार्गाने जात आहेत याला जबाबदार कोण आहे. ..? दिवसेंदिवस वाढत असलेली बेरोजगारी सुशिक्षित तरूणांना मृत्यूच्या दाराजवळ नेत आहे,व्यसनाच्या आहारी जात आहेत वरतून त्यांचे आईबाबांना चिंतेने ग्रासलेले आहेत अशा सुशिक्षित बेरोजगारांचे भविष्य तरी कसे उज्ज्वल व्हावे...? हा एक मोठा भारी प्रश्न आहे.**



ह्या महत्वाच्या विषयावर कोणीही बोलत नाही खुर्चीच्या लालसेपोटी आपपसात लढत आहेत व स्वार्थी होऊन जगत आहेत त्यामुळे देशात असणाऱ्या सुशिक्षित बेरोजगार तरूणांचे वाली आहेत की,नाही फारसं दिसून येत नाही. एका अर्थाने बघायला गेले तर...अनेक वर्गात सुशिक्षीत बेरोजगार तरूण आहेत पण,ओबीसी वर्गात बहुतांश असे अनेक तरूण उच्च शिक्षण घेऊन बेरोजगार आहेत कारण, त्यांच्या शिक्षणासाठी शासनाकडून तेवढी मदत मिळत नाही. काही तरूणांचे आईबाबा शेतकरी आहेत तर काहींचे मोलमजुरी करणारे आहेत तर काही तरूण स्वतःच काम करून उच्च शिक्षण घेण्यासाठी शहरात वास्तव्यास आहेत सर्व साधारण लोकांचे जीवन कसे असते याकडे मात्र लक्ष दिले जात नाही ही फार मोठी शोकांतीका आहे, त्यात दुसरी शोकांतिका. अशी आहे की, ओबीसी वर्गातील ग्रामीण भागात राहणाऱ्या अशा अनेक तरूणी पुढचं शिक्षण घेऊ शकत नाही कारण पुढचे शिक्षण घेण्यासाठी वसतिगृहाची सोय दिसत नाही फार मोठी गंभीर परिस्थिती आहे.

या,तीन, चार दिवसात वृतपत्रात एक बातमी वाचण्यात आली होती की, जिल्हा परिषद शाळांमध्ये सेवानिवृत शिक्षक नेमनार ,शिक्षकांची कमतरता असल्यामुळे राज्य सरकारने निर्णय घेतला आहे पण, याच महाराष्ट राज्यात उच्च शिक्षण घेऊन बेरोजगार तरूण किती आहेत त्यांचा मात्र विसर पडलेला दिसत आहे. जिल्हा परिषद शाळांमध्ये एवढ्या जागा रिक्त असतांना सुध्दा सुशिक्षित बेरोजगारांचा विचार केला जात नसेल तर.. कुठेतरी त्यांच्या जिवंतपणाच्या अपेक्षांची अंतयात्रा निघत आहे म्हणायला काहीच हरकत नाही . आजचा सुशिक्षित बेरोजगार तरूण न्यायाच्या प्रतिक्षेत वाट बघत आहे एकदातरी न्याय मिळावा पण, त्यांचा विचार केला जात नसेल तर मात्र विचारच करायला लावणारी बाब आहे. सुशिक्षित बेरोजगार तरूण खेडोपाड्यात, शहरात सुध्दा बहुसंख्येने आहेत त्यांचा विचार कोणी करावा. ..? असेच जर शासनाने पाठ फिरवली तर...त्यांच्यात नैराश्याची भावना तर येणारच आहे. प्रत्येक सुशिक्षित बेरोजगार तरूणाला अपेक्षा असतेच पण,ती अपेक्षा पुर्ण होत नसेल तर...त्यांनी शिक्षण तरी कशासाठी घ्यावे. ...? एवढ्या जागा रिक्त आहेत त्या जागा भरण्यासाठी सुशिक्षित बेरोजगारांना घेण्यात यावे, त्यांचा विचार केला जावा. त्यांची कदर केली जावी, त्यांचे कष्ट जाणावे, त्यांचेही स्वप्न पूर्ण झाले पाहिजे, त्यांचा चालत असलेला संघर्ष बघावा, नैराश्याची भावना ठेवून नको त्या वाटेने जाण्यापासून थांबवावे आणि कुठेतरी त्यांच्या शिक्षण घेण्याला अर्थ लागला पाहिजे असा न्याय करावा. या वाढत्या महागाईमुळे व हाताला नीट काम न मिळाल्याने सुशिक्षित तरूण बेरोजगार झालेला आहे,हाल अपेष्टा सहन करत आहे आणि न्याय मिळण्याच्या प्रतिक्षेत आहेत . म्हणून त्यांचा विचार करणे आज काळाची गरज आहे.

# उत्तर आणि वायव्य भारतात पावसाचा कहर सुरूच.



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**सध्याच्या परिस्थितीत देशातील उत्तर आणि वायव्य भागातील अती पावसामुळे गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे.यामुळे भुस्खलन व नद्यांच्या पुरामुळे मोठ्या प्रमाणात जिवित हाणी सुध्दा झाली आहे.त्याचप्रमाणे शेतात पाणी घुसल्याने शेतकऱ्यांचे सुध्दा मोठे नुकसान झाले आहे.पावसाळ्याची गंभीर परिस्थिती पहाता सर्वांनी स्वतःला सांभाळने गरजेचे आहे. यावर्षी पाऊस उशिरा आला. परंतु देशातील काही भागात पावसाने उग्र रूप धारण केल्याने देशातील अनेक भागात पुर परिस्थीती निर्माण होवून अनेक भाग जलमग्न झाल्याचे दिसून येते. सध्याच्या परिस्थितीत दिल्ली, उत्तर प्रदेश, ओडिशा, झारखंड, बिहार, सौराष्ट्र व कच्छ, पंजाब, हरियाणा, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश सह अनेक भागात सरासरी पेक्षा जास्त पाऊस झाल्याने पावसाने विक्राळ रूप धारण केले आहे.**

यामुळे जिकडे पहाल तिकडे आपल्याला पाणीच पाणी दिसते.काही भागात ढग फुटी सुध्दा झाली आहे.यामुळे सर्वत्र गंभीर परिस्थिती निर्माण झाली असून मोठ्या प्रमाणात मानवी व पशुपक्षांची जीवित हाणी सुध्दा झाली आहे.देशात अनेक नद्यांना महापुर आलेला असुन संपूर्ण नद्या तुडुंब भरून धोकादायक स्थितीमध्ये आहेत.यामुळे अनेक धरण भरल्याने प्रत्येक धरणाचे दरवाजे उघडण्यात आले आहेत.त्यामुळे भारतात आपल्याला पुराने थैमान निर्माण झाल्याचे दिसून येते.देशात अनेक भागांमध्ये पुरांमुळे अनेक गावांचा संपर्क तुटल्याचे दिसून येते. हिमाचल प्रदेशात तर पावसाने भयानक धुमाकूळ घातला आहे. हिमाचल प्रदेशात झालेल्या मुसळधार पावसामुळे आठ हजार कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगितले जाते.भूस्खलन, रस्त्यांना खड्डे, पूरस्थितीमुळे रस्त्यासह पायाभूत सुविधांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.त्याचप्रमाणे अती पावसामुळे ग्रामीण व शहरी भागातील रस्त्यांना मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने दुर्घटनांचे प्रमाणात प्रमाणात वाढले आहे जनुकाय अती पाऊस "मौत का कुवॉ" बनल्याचे दिसून येते.हा सर्वप्रकार निसर्गाचा ह्यास होत असल्याने निर्माण झालेला आहे. त्यामुळे जीवीत हानी सुध्दा होत आहे.पावसाचे विक्राळ रूप पहाता व यामुळे निर्माण होणारी पुरपरीस्थीती, रस्त्यांना पडलेले खड्डे यामुळे होणाऱ्या दुर्घटना यापासून सर्वांनीच सतर्क राहाने गरजेचे आहे.त्यामुळे जनतेने सुरक्षेच्या दृष्टिकोनातून नदी-नाल्याचा पुर, रोडचे खड्डे यापासून सावध रहावे जेनेकरून आपल्याला जिवीत हानी टाळता येईल.कारण "जान है तो जहान है"हा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारला पाहिजे.आपण निसर्गाच्या महाप्रलयाला रोखु शकत नाही.परंतु सावधगिरी अवश्य बाळगू शकतो.त्यामुळे या कठीण घडीला प्रत्येकांनी आपापल्या परीने सावधगिरी बाळगली पाहिजे.कारण आपल्या पुर्वजांनी सांगितले आहे की "आगीशी व पाण्याशी खेळु नये".त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत पावसाच्या पाण्यापासुन सावधान रहाने अत्यंत गरजेचे आहे. त्याचप्रमाणे नदी-नाल्याच्या पुरातुन जावु नये किंवा प्रवास करू नये व स्वतःचा जीव धोक्यात टाकू नये.आज देशातील अनेक क्षेत्रातील घरे व शेती पाण्याखाली आलेली आहेत त्यामुळे गंभीर परिस्थिती आहे. सध्याच्या परिस्थितीत पावसाच्या पाण्याने विक्राळ रूप धारण केल्याने पशुपक्षी व मानवजातीसाठी काळ बनल्याचे दिसून येते.त्यामुळे सर्वांनीच नदी-नाल्याच्या पुरांपासुन सावधान राहुन आपले कार्य करावे व "जान है तो जहान है" हा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारावा.कारण देशातील पुरपरिस्थितीवर सरकारी यंत्रणा आपली चोख भुमिका बजावीत आहे.अशा परिस्थितीत सरकारी यंत्रणेला सर्वांनीच मदत करेन गरजेचे आहे.

# वृद्धांसाठी आपण काय करू शकतो ?



सीमा गाडेकर
संपर्क क्र. 9423172305

आधुनिक केसरी

**आज सकाळी आकाशवाणी केंद्र औरंगाबाद वरील बातम्यांमध्ये प्रसिद्ध अभिनेता रवींद्र महाजनी यांचे निधन ही बातमी ऐकली.. आणि मन सुन्न झाले.. मुंबईचा फौजदार या चित्रपटातील हिरोची व्यक्तिरेखा आठवली. मराठी चित्रपट सृष्टीतील माझा सर्वात आवडता अभिनेता म्हणजे रवींद्र महाजनी. त्यांच्या निधनाची वार्ता ऐकून मन बेचैन झाले आणि आपल्या आवडीच्या अभिनेत्याला काय बरं झाले असावे याचं कारण शोधण्यासाठी हातात मोबाईल घेतला तेव्हा प्रसार माध्यमाद्वारे कळाले की प्रसिद्ध अभिनेते रवींद्र महाजनी मृतावस्थेत आढळले. तळेगाव MIDC पो स्टे हद्दीत एक्सरबीया सोसायटी, MIDC रोड, आंबी येथे मराठी सिने अभिनेता रवींद्र हनुमंत महाजनी (वय 77 वर्षे) हे बंद फ्लॅटमध्ये मृत अवस्थेत मिळून आले आहेत. ते गेले 7- 8 महिन्यापासून वरील ठिकाणी एकटेच राहण्यास होते. त्यांचा मृत्यू 2-3 दिवसांपूर्वी झालेला असावा. मुलं , संपत्ती, नाव सर्व असून असं मरण यावं हे फार दुर्दैवी आहे.**

२/३ दिवसात साधी ख्याली खुशाली कुणी घेतली नसावी ? विचारात पाडणारा प्रश्न आहे. सर्व असूनही माणसाच्या सोबत कुणी माणूस नसेल तर नाव, पैसे सर्व व्यर्थ आहे. मराठी चित्रपट सृष्टीवर अधिराज्य गाजवणाऱ्या अत्यंत देखण्या आणि अष्टपैलू व्यक्तिमत्व असणाऱ्या, सुप्रसिद्ध अभिनेत्याचा अशाप्रकारे अंत व्हावा ही खूप वाईट आणि मनाला चटका लावून जाणारी घटना आहे.

एका निखळ हास्याचा झालेला असा दुर्दैवी अंत वाचून काही वर्षांपूर्वी औरंगाबाद शहरांमध्ये मामा चौक पदमपुरा येथील घटना आठवली. पदमपुरा येथील एका फ्लॅटमध्ये "वयोवृद्ध दापत्यांचे कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळले होते"... सदरील दुर्दैवी घटनेमधील श्री विजय मेहंदळे हे वाल्मी येथून कनिष्ठ अभियंता म्हणून सेवानिवृत्त झालेले होते. एका उच्चशिक्षित व्यक्तीचा अशाप्रकारे त्या उच्च शिक्षित दापत्यांचा झालेला अंत वाचून मन हेलावून गेलं. दहा-बारा दिवसापासून एका फ्लॅट मध्ये मृत्युमुखी पडलेले हे दोन जीव जागेवरच कुजायला लागले आणि दुर्गंधी जेव्हा बाहेर पसरली तेव्हा कुठे पोलिसांच्या मदतीने हे सत्य उजेडात आलं. घटना वाचून माझ्या डोक्यामध्ये प्रश्नानं थैमान घातलं... आणि आज रवींद्र महाजनी या अभिनेत्याबद्दलही असंच घडलं.. अशा घटना वाचून आणि ऐकून माझ्या मनात विचारांचं वादळ उठलं.. आज आपण पाहतो की असे असंख्य वयोवृद्ध प्रत्येक शहरांमध्ये प्रत्येक गावांमध्ये एकाकी जीवन जगताना दिसतात यात चुक नेमकी कोणाची ? कायम्हणावं या संस्कृतीला ? कायम्हणावं या समाजाला ? कायम्हणावं या शेजाऱ्यांना ? कायम्हणावं या नातेवाईकांना ? कायम्हणावं उच्चविद्याविभूषित मुलांना ? कायम्हणाव परदेशी स्थायिक झालेल्या मुलांना ? कायम्हणावं अशा पालकांना ज्यांना वाटतं की आपल्या मुलांना आय. आय. टीकरून मोठ्यात मोठ्या आकड्याचा पॅकेज मिळवावं ? यात चूक नेमकी कोणाची ? समाजात घडणाऱ्या अशा घटनांना जबाबदार कोण ? मान्य आहे काळानुसार सर्वच बदलत आहे.. पण म्हणून का नात्यातील ओलावा च नष्ट झाला आहे.. माणसातील माणुसकीच हद्दपार झाली आहे.. कुठे लोप पावला माझा संकटसमयी धावून येणारा शेजारधर्म ??... कुठे नाहीशी झाली माझी एक तीळ सात जण खाणारी भारतीय संस्कृती....... बातमी वाचून माझ्या मनात प्रश्नांचं काहूर उठलं... खरंतर प्रत्येकाच्याच मनाला चटका लावणारी ही घटना आहे.... माझ्या मनाला जसे प्रश्न पडले तसेच प्रश्न तुमच्याही मनामध्ये आले का हो ?? सापडतील का आपल्याला आपल्याच मनात पडलेल्या प्रश्नांची उत्तरं...... कराल का मला मदत माझ्या प्रश्नांची उत्तरं मिळवायला... ????

1. आपल्या मुलांनी मोठे पॅकेज मिळवाव परदेशी नोकरी करावी असं कित्येक पालकांना वाटतं... यातच खरं सुख म्हणता येईल का ? पैसा म्हणजे सुख असतं का ? हे आपल्या पालकाचं कितपत योग्य आहे. ? शेवटी पैसाच सर्व काही असतो का ?

2. उच्च विद्या विभूषित होऊन जेव्हा मुले नोकरी साठी परदेशी जातात आणि तिथेच स्थायिक होतात अशा मुलांना गलेलठ्ठ पगाराच्या आकड्याला पुढे जन्मदात्या आई-वडिलांची काहीच किंमत का वाटत नाही ? ज्या आईन मरण यातना सोसून आपल्याला जन्माला घातलेला असतं जिच्यामुळे आपण हे सुंदर जग बघू शकतो... आणि ज्या बापाने आपल्या मुलाच्या भवितव्यासाठी आयुष्यभर कष्ट उपसलेले असतात अश्या या दोन जिवापेक्षा मुलांना पैसा मोठा का वाटावा ???.. पैसा जवळचा का वाटतो आणि पैशाच्या मागे धावता-धावता आपल्याला घडवणाऱ्या आपल्या वृद्ध माता-पित्यांचा त्यांना पूर्णतः विसर पडतो यात चुक नेमकी कोणाची पालकांची का मुलांची ?



2. जरी मुलगा/मुलगी, सून अथवा जावई सातासमुद्रापार राहत असतील वर्षानुवर्ष जन्मदात्यांना भेटायला त्यांना वेळ नसेल तरी 24 तासा पैकी किमान पाच मिनिटाचा एक फोन करायला त्यांच्याकडे खरंच वेळ नसतो का ? माणूस खरंच एवढा बिझी असतो का ? 3. एकाकी जीवन जगत असणाऱ्या मातापित्यांच्या मुलांकडे/ मुलींकडे मातापित्यांच्या शेजारी राहणाऱ्या शेजारयांचे नंबर नसावेत का ? जेव्हा आई-वडील फोन उचलत नाहीये तेव्हा मुलांचं कर्तव्य नाही का शेजार्यांना फोनकरून आपल्या मातापित्यां बद्दल चौकशी करणे... अथवा एखाद्या नातेवाईकांना कळवणे...

4. पैसा कमावण्याच्या नादात तुम्हाला आपल्या मातापित्यांना वेळ देता येत नसेल तर किमान तुम्ही कमवत असणाऱ्या पैशातून थोडाफार पैसा तुम्ही माता-पित्यांना साठी एखादा केअरटेकर ठेवून त्याच्या पगारासाठी खर्चकरू शकत नाहीत का ???

5. अंथरुणाला खीळलेल्या व वयोवृद्ध झालेल्या व्यक्तीच्या घरात एकही कामवाली नसावी का ??


6. भविष्यात पुन्हा अशा घटना घडू नये म्हणून आजच्या घडीलाआपणकायपावले उचलली पाहिजेत.. याबद्दल आपलं कायमत आहे ?

7. एकाकी जीवन जगत असणाऱ्या अशा वृद्ध दाम्पत्याच्या साठीआपणकोण कोणत्या एनजीओची मदत घेऊशकतो ? 4. अशावृद्धांसाठीसरकारी योजना द्वारे कायकायमदत मिळू शकते ? 5. आज 35 ते 50 वयोगटातीलआपणसर्वांनीकाययोजना केल्या पाहिजेत ?? जेणेकरून भविष्यात अशा घटना घडणार नाही.

# सुपरस्टार राजेश खन्ना


आधुनिक केसरी

**हिंदी चित्रपट सृष्टीतील पहिले सुपरस्टार म्हणून ओळखले जाणारे जेष्ठ अभिनेते राजेश खन्ना यांची आज दहावी पुण्यतिथी. राजेश खन्ना यांचा जन्म २९ डिसेंबर १९४२ रोजी पंजाबमधील अमृतसर येथे झाला. राजेश खन्ना यांचे मूळ नाव जतीन खन्ना असे होते. त्यांच्या आईचे नाव चंद्राणी खन्ना तर वडिलांचे नाव लाला हिराणी असे होते. त्यांचे वडील शाळेत मुख्याध्यापक होते.**



त्यांच्या एका जवळच्या नातेवाईकांना मुलबाळ नव्हते म्हणून त्यांच्या आई वडिलांनी त्यांना त्या नातेवाईकांकडे दत्तक दिले. त्यांच्या नवीन आईचे नाव लीलावती खन्ना तर वडिलांचे नाव चुनीलाल खन्ना असे होते. चुनीलाल खन्ना रेल्वे कंत्राटदार होते. ते मुंबईत राहत होते. राजेश खन्ना हे सेंट सबिस्टाईन गॉन हायस्कूल येथे शिकत असताना त्यांची रवी कपूर यांच्याशी ओळख झाली. रवी कपूर म्हणजेच हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते जितेंद्र. राजेश खन्ना व जितेंद्र यांनी कॉलेज जीवनात अनेक नाटकात एकत्र काम केले. नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी राजेश खन्ना हे पुण्यात आले. पुण्यात दोन वर्ष शिक्षण घेतल्यावर ते पुन्हा मुंबईला परतले. मुंबईत काही दिग्दर्शकांनी टॅलेंट हंट स्पर्धा आयोजित केली. राजेश खन्ना यांच्या काकांनी त्यांचे नाव या स्पर्धेकरिता नोंदवले. ते नोंदवताना त्यांनी त्यांचे नाव जतीन खन्ना ऐवजी राजेश खन्ना म्हणून नोंदवले पुढे याच नावाने ते ओळखले जाऊ लागले. या स्पर्धेत त्यांनी पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक मिळवले त्यांच्या अभिनयाने त्याकाळातील दिग्गज दिग्दर्शक प्रभावित झाले. १९६६ साली चेतन आनंद यांनी त्यांना आखरी खत या चित्रपटात संधी दिली हाच त्यांचा पहिला चित्रपट. हा चित्रपट ऑस्करला गेला होता. पहिल्याच चित्रपटातील त्यांच्या अभिनयाने चित्रपट रसिक तसेच जाणकार प्रभावित झाले त्यामुळे त्यांना अनेक चित्रपट मिळाले. त्याकाळातील यशस्वी दिग्दर्शक असणारे शक्ती सामंत यांनी त्यांना आराधना या चित्रपटात नायकाची भूमिका दिली. या चित्रपटात शर्मिला टागोर या त्यांच्या नायिका होत्या. चित्रपट सुपरहिट झाला. या चित्रपटातील सर्व गाणी लोकप्रिय झाली. या चित्रपटा नंतरच राजेश खन्ना सुपरस्टार म्हणून ओळखले जाऊ लागले. राजेश खन्ना यांची अदाकारी, संवाद फेकीची लकब यावर तरुणाई फिदा झाली. विशेषतः कॉलेज मधील मुली त्यांच्यावर जीव ओवाळून टाकू लागल्या. त्यांचे चाहते त्यांच्या गाडीचे चुंबन घ्यायचे. मुली त्यांच्या गाडीची धूळ आपल्या भांगेत भरत. बऱ्याचश्या मुलींनी त्यांच्या फोटोशी लग्न केले होते. त्यांना चाहत्यांचे जितके प्रेम लाभले तितके प्रेम कोणत्याच कलाकाराला लाभले नाही. राजेश खन्ना यांचे सलग १५ चित्रपट सुपरहिट झाले हा एक विक्रम आहे. तो अजूनही कोणत्या अभिनेत्याला तोडता आला नाही. शर्मिला टागोर, मुमताज, अशा पारेख, तनुजा यांच्याशी त्यांची चांगली केमिस्ट्री जमली. सत्तरच्या दशकात राजेश खन्ना सुपरस्टार पदावर आरूढ झाले होते. चालण्या बोलण्याची विशिष्ट ढब, मानेला खास झटका देत, हातवारे करत नाचण्याची अनोखी शैली, जबरदस्त संवाद फेक आणि ओठावर रुंजी घालतील अशी गाणी यामुळे राजेश खन्ना हे अफलातून रसायन बनून गेले. त्याकाळात सर्वाधिक मानधन घेणारे राजेश खन्ना यांची प्रेम प्रकरणेही गाजली पण १९७३ साली त्यांनी आपल्या पेक्षा कितीतरी लहान वयाच्या डिंपल कपाडिया यांच्याशी विवाह केला. १९९२ साली काँग्रेसच्या वतीने त्यांनी दिल्ली मतदार संघातून लोकसभेची पोटनिवडणुक लढवली आणि ते खासदार म्हणून निवडून आले.






१८ जुलै २०१२ रोजी राजेश खन्ना यांनी चाहत्यांना अलविदा म्हणत जगाचा निरोप घेतला आणि बॉलिवूडचा पहिला सुपरस्टार काळाच्या पडद्याआड गेला.

"बाबूमोशाय.......
बाबू मोशाय जिंदगी
और मौत उपरवाले के
हात है जहाँपणा...
जिसे ना तो आप बदल
सकते है ना मै.... हम
सब तो रंगमंच की
कटपुतलीया है, जीसकी
डोर उपरवालेकी
उंगलीओमे बंधी
है....कब कोण
उठेगा कोई बता
सकता....." आनंद
मरते नहीं वह हमेशा
रहते है.... we all miss you..
कैसे
नहीं
कभी
याद



शाम ठाणेदार, पुणे




# आंतरराष्ट्रीय न्याय दिवस

आधुनिक केसरी



प्रज्ञा पंडित, ठाणे
संपर्क क्र. 9320441116

**दरवर्षी 17 जुलै हा दिवस जागतिक आंतरराष्ट्रीय न्याय दिवस (वर्ल्ड डे फॉर इंटरनॅशनल जस्टीस) म्हणून ओळखला जातो. या दिवसाला आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्याय दिन किंवा आंतरराष्ट्रीय न्याय दिन असेही म्हंटले जाते. स्थानिक, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय कोणत्याही स्तरावरील असो, सामाजिक हिताच्या दृष्टीने गुन्हेगारी हा गंभीर असा विषय आहे. स्थानिक अथवा राष्ट्रीय पातळीवरील गुन्हेगारी रोखण्यासाठी वर्तमान न्याय व्यवस्था आपापल्या परीने काटेकोर प्रयत्न करत असते.**

त्याच धर्तीवर आंतरराष्ट्रीय गुन्हेगारीची देखील तेवढ्याच गांभीर्याने दखल घेत त्यावर आवश्यक त्या नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी आणि न्यायालयाचे कार्य आणि त्याचे महत्व अधोरेखित करण्यासाठी हा दिवस पाळला जातो. 17 जुलै 1998 रोजी रोम परिनियम वर्धापनदिनानिमित्त हा दिवस आयोजित केला जातो ज्या द्वारे आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाची स्थापना झाली. सन 2010 रोजी कंपाला ( युगांडा ) मध्ये झालेल्या रूम विधान कायद्याचा आढावा परिषदेत राज्य पक्षांच्या असेंब्लीने 17 जुलै हा आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायाचा दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायाला प्रोत्साहन देणे आणि ICC च्या कार्याला पाठिंबा देण्याचा एक मार्ग हेच ह्या दिनविशेषाचे उद्दिष्ट आहे. ICC म्हणजे आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालय. रोममध्ये 120 राज्यांनी एक कायदा स्वीकारला तेव्हा ही संस्था अस्तित्वात आली. आयसीसी आंतरराष्ट्रीय फौजदारी न्यायालयाचा रोम कायदा ( "रोम स्टॅचर" ) म्हणून ओळखले जात असे. ज्या देशांनी हा कायदा स्वीकारण्यास सहमती दर्शवली ते सर्व देश तत्कालीन गंभीर गुन्ह्यांवर खटला चालवण्यासंदर्भात आयसीसीच्या अधिकारक्षेत्राला मान्यता देत होते. राष्ट्रीय न्यायालय आणि न्याय व्यवस्थेची सन्माननिय जागा आणि अधिकार अबाधित ठेवत फक्त आंतरराष्ट्रीय खटल्यात हस्तक्षेप करण्यासाठी आयसीसी ला मान्यता दिली गेली. या दिवसाचे उद्दिष्ट न्यायाचे समर्थन तसेच पीडितांच्या हक्कांना प्रोत्साहन देऊ इच्छिणाऱ्या प्रत्येक समविचारी नागरिकांना एकत्र आणणे , गंभीर गुन्ह्यांना प्रतिबंध करणे तसेच जगभरात शांतता, सुरक्षा प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्नशील राहणे हे आहे. जागतिक आंतरराष्ट्रीय न्याय दिन 2023 ची थीम -

दरवर्षी जागतिक न्याय दिन एका विशिष्ट थीम अंतर्गत साजरा केला जातो. 2023 च्या जागतिक आंतरराष्ट्रीय न्याय दिनाची थीम "अडथळ्यांवर मात करणे आणि सामाजिक न्याय सर्वांना मिळवून देणे" अशी आहे. समाजात घडणाऱ्या अनेक दुर्दैवी घटना, अन्याय, असमानता याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी अनेक उपक्रम या दिवसाच्या निमित्ताने जगभरात आयोजित केले जातात. एक सुजाण नागरिक म्हणून प्रत्येकाने या दिवसाची दखल घेत वैयक्तिक आणि सामाजिक पातळीवर येणाऱ्या या विषयाच्या अनुषंगाने नवीन पिढीसाठी प्रबोधनपर शिबिरे आणि चर्चा सत्रे, स्पर्धा यांचे आयोजन केले जाणे ही काळाची गरज आहे.

# बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेतील माहेरचे वर्णन



प्रा .सौ. शारदा वानखेडे
संपर्क क्र. 9823066606

आधुनिक केसरी

**"माहेर "हा शब्द जणू प्रत्येक संसारिक स्त्रीसाठी जिव्हाळ्याचा, जिवाभावाचा आहे .स्त्री मग ती कोणतीही असो गरीब ,श्रीमंत, तरुण , म्हातारी प्रत्येकीला माहेराची ओढ सारखीच असते. प्रत्येकीचा आपल्या माहेरावर सारखा जीव गुंतलेला असतो. पूर्वीच्या काळी आजच्यासारख्या सोयीसुविधा नव्हत्या परंतु असे असले तरी माहेरी जाणं हे व्हायचंच. सण समारंभ किंवा काही निमित्ताने स्त्रिया माहेरी जात. माहेरच्या आठवणींनी त्याही तेवढ्याच व्याकुळ होत. आजच्या मोबाईलच्या युगात व्हिडिओ कॉल केला की आपण प्रत्यक्ष एकमेकांना समोर पाहू बोलू, शकतो पण पूर्वी असे नव्हते ,फार तर एखादे पत्र पाठवले जाई पण तेंव्हा सर्वांनाच लिहिता वाचता येत नव्हते म्हणून तेही तेवढे शक्य होत नसे.**

पूर्वी एकत्र कुटुंब पद्धती होती, त्यामुळे घरात अनेक माणसांचा राबता होता .म्हणून स्त्रियांना माहेरी निवांतपणे राहता येत असे .आजच्या काळात विभक्त कुटुंब पद्धतीमुळे किंवा नोकरी मुलांच्या शाळा इ. जबाबदाऱ्यांमुळे स्त्रियांना जास्त दिवस माहेरी राहता येत नाही .तरीही वर्षातून एकदा तरी माहेरी जाणं होतच.

मराठी साहित्याचा अभ्यास करत असताना आपल्याला अनेक कवी- कवयित्रींनी माहेराचे वर्णन केलेले दिसून येते अशाच एक अशिक्षित पण प्रतिभा संपन्न कवयित्री म्हणजे निसर्ग कन्या बहिणाबाई चौधरी होत. त्यांच्या कवितेचे वर्णन करताना प्रसिद्ध साहित्यिक आचार्य अत्रे "बहिणाबाई ची गाणी "या पुस्तकाच्या 'परिमळ 'या प्रस्तावनेत म्हणतात "एखाद्या शेतात मोहरांचा हंडा अचानक सापडावा तसा बहिणाबाईंच्या काव्याचा शोध गेल्या दिवाळीत महाराष्ट्राला लागला. त्यांच्या शब्दाशब्दातून प्रतिभा नुसती झिरपते आहे ,असे सरळ आणि सोज्वळ काव्य मराठीत फार फार थोडे आहे. आणि हे एका अशिक्षित स्त्रीने लिहिले आहे हा तर तोंडात बोट घालायला लावील असा चमत्कार आहे. जुन्यात चमकेल आणि नव्यात झळकेल असे हे काव्य आहे .हे बावण्णकशी सोनं आहे. ते महाराष्ट्रापासून लपवून ठेवणे गुन्हा आहे."

बहिणाबाईंचा जन्म ११ ऑगस्ट १८८० रोजी नागपंचमीच्या दिवशी जळगाव जिल्ह्यातील 'आसोदं'या गावी झाला त्यांच्या आईचे नाव भिमाई व वडिलांचे नाव उखाजी महाजन होते .वयाच्या तेराव्या वर्षी जळगावचे खंडेराव चौधरी यांचे पुत्र नथुजी चौधरी यांच्याशी त्यांचा विवाह झाला. सोपानदेव, ओंकार ही दोन मुले व कासाबाई ही कन्या अशी तीन अपत्ये त्यांना होती .दुर्दैवाने वयाच्या अवघ्या ३० वर्षी त्यांना वैधव्य आले. त्यांच्यावर आलेले संकट खूप मोठे होते तरीही त्यांनी न डगमगता आलेल्या परिस्थितीचा स्वीकार केला.

बहिणाबाई आपली दैनंदिन कामे करता करता ज्या ओव्या गात त्याच ओव्या आज आपल्यासमोर' बहिणाबाईंची गाणी 'या पुस्तकाच्या रूपात आलेल्या आहेत .त्यांच्या या काही ओव्या त्यावेळी त्यांचे पुत्र सोपानदेव चौधरी यांनी लिहून ठेवल्या तर काही ओव्या त्यांच्यासोबतच गेल्या पुढे कविवर्य सोपानदेव चौधरी व आचार्य अत्रे यांनी त्या महाराष्ट्रासमोर आणल्या.मन,संसार,शेती ,निसर्ग ,जीवन, माणूस असे अनेक विषय त्यांच्या ओव्यांमधून त्यांनी अगदी सहजपणे मांडलेले दिसतात. अगदी अशिक्षित ,अडाणी माणसालाही सहज समजेल अशी बहिणाबाईंची कविता आहे.

असाच एक प्रत्येक स्त्रीच्या जिव्हाळ्याचा विषय म्हणजे 'माहेर 'त्यांच्या अनेक ओव्यांमधून त्यांनी आपली माहेराविषयीची ओढ ,प्रेम व्यक्त केलेले दिसून येते. त्यांच्या मनात जेंव्हा माहेरी जाण्याची इच्छा होते तेंव्हा त्यांची ती भावना, ती ओढ त्या पुढील कवितेतून व्यक्त करतात.

**आज माहेराला जानं**
**झाली झाली वो पहाट**
**आली आली डोयापुढे**
**माझ्या माहेराची वाट**

माहेरी जाण्यासाठी आतुर असलेल्या बहिणाबाई पहाटेच लवकर उठून माहेरी जाण्याची सर्व तयारी करतात .तेंव्हा त्यांच्या डोळ्यापुढे माहेराची वाट येते त्या म्हणतात.

**लागे पायाले चटके ,**
**रस्ता तापी सनी लाल**
**माझ्या माहेराची वाट,**
**मालेवाटे मखमल**
**माझ्या माहेराच्या वाटे,**
**जरी आले पायी फोड**
**पाय चालले चालले,**
**अशी माहेराची ओढ**

बहिणाबाई माहेरी जाताना त्यांच्या माहेराची वाट उन्हाने तापून लाल झाली आहे व त्यामुळे जरी पायाला चटके बसत असले तरी त्यांना माहेराच्या ओढीमुळे त्याचा त्रास वाटत नाही . उलट ती वाट त्यांना मऊ मखमली वाटते. माहेरी जाताना बहिणाबाईंना पायाला चटके तर बसतातच पण त्याचबरोबर त्यांना दगडाच्या ठेचाही लागतात. पायाला ठेचा लागेपर्यंत तेवढ्या ओळीने त्या माहेरच्या वाटेने चालतात .आपल्या कवितेच्या पुढील ओळीत त्या म्हणतात.

**माझ्या माहेराच्या वाटे**
**जरी लागल्या रे ठेचा**
**वाटेवरच्या दगडा**
**तुला फुटली रे वाचा**

दगडाची ठेच लागल्यावर बहिणाबाईंना वाटेवरचा दगड जणू आपूलकीने विचारतो त्यालाही वाचा फुटते तो म्हणतो,

**नीट जाय मायबाई**
**नको करू धडपड**
**तुझ्याच मी माहेरच्या**
**वाटेवरचा दगड**

माहेरी येणाऱ्या लेकीविषयी माहेरच्या प्रत्येक माणसाला आपुलकी असते तशीच आपुलकी प्रेम माहेरच्या वाटेवरच्या दगडालाही बहिणाबाई विषयी वाटते म्हणूनच त्याला वाचा फुटून जणू काही तो बहिणाबाईंना नीट जपून जा म्हणून सांगतो. बहिणाबाईंच्या ओठी सतत माहेराचे गाणे व माहेरचा मोठेपणा असे. त्या आपल्या माहेरा विषयी सारख्या आठवणी काढत त्यांची ही ओढ पाहून एक योगी त्यांना प्रश्न विचारतो तो म्हणतो जर तुला माहेराची इतकी ओढ आहे तर तू सासरी का आलीस ?योग्याचा प्रश्न बहिणाबाईंनी कवितेच्या रूपात पुढील ओळीतून मांडलेला आहे.

**माझं माहेर माहेर**
**सदा गाणं तुझ्या ओठी**
**मग माहेरुन आली**
**सासरले कशासाठी ?**

यावर बहिणाबाईंनी त्या योग्याला मार्मिकपणे उत्तर दिले आहे . ते योग्या बरोबरच सर्व रसिकांनाही आश्चर्यचकित करणारे आहे. बहिणाबाई म्हणतात की,

**अरे लागले डोहाये**
**सांगे शेतातली माटी**
**गाते**



**माहेराचं गानं**
**लेक येईल अरे पोटी**

एखाद्या स्त्रीला जेंव्हा डोहाळे लागतात. तेंव्हा शेतातली माती खाण्याची तिची इच्छा होते व अशी माती खाण्याची इच्छा झाली म्हणजे ती स्त्री गर्भवती आहे असे त्यावेळी मानले जात असे. बहिणाबाईंनाही जेंव्हा माटी म्हणजेच शेतातली ( माती ) खाण्याची इच्छा होते तेंव्हा माझ्या पोटी लेक जन्माला यावी असा आजचा प्रगत दृष्टिकोन त्यांनी समोर ठेवल्याचे दिसते. वास्तविक पाहता मुलगा व्हावा असे प्रत्येकाला वाटत असते परंतु बहिणाबाई मात्र लेक पोटी यावी अशी इच्छा व्यक्त करतात. पुढे बहिणाबाई योग्याला म्हणतात.

**दे रे दे रे योग्या ध्यान**
**ऐक काय मी सांगते**
**लेकीच्या माहेरासाठी**
**माय सासरी नांदते**

आपल्या लेकीला माहेर मिळावे म्हणून प्रत्येक आई सासरी नांदत असते. सासरी नांदण्याचे एक वेगळेच कारण बहिणाबाईंनी येथे सांगितले आहे. आपल्याला कधी उचकी ( गुचकी ) लागते तेंव्हा आपली कुणीतरी आठवण केली आहे असे आपण समजतो. बहिणाबाईंना जेंव्हा अशी उचकी माहेराच्या वाटेने जाताना लागते तेंव्हा त्या म्हणतात,

**माझ्या माहेराच्या वाटे**
**मला लागली गुचकी**
**आली उडत उडत**
**एक दिसली सायंकी**

बहिणाबाईंना वाटते ती सायंकी जणू त्यांच्या येण्याचा निरोप त्यांच्या माहेरी देते.पुढे बहिणाबाई म्हणतात,

**माझ्या माहेराच्या वाटे**
**मारे सायंकी की भरारी**
**माझ्या जायच्या आधी**
**सांगे निरोप माहेरी**
**ऊठ ऊठ भीमा माय**
**काय घरात बसली**
**कर गुरमय रोट्या**
**लेक बहीणाई आली**

लेक माहेरी आली म्हणजे आई तिच्यासाठी वेगवेगळे पदार्थ बनवते तिला मायेने खाऊ घालते. जणू काही ( सायंकी. म्हणजेच साळुंकी ) बहिणाबाईंच्या आईला त्यांच्या पोहोचण्या आधीच निरोप देते. लेक बहिणाई माहेरी आली तिच्यासाठी गुरमय रोट्या ( गुळाची पोळी ) करायला साळुंकी सांगते असे बहिणाबाईंना वाटते.

माहेराची वाट चालत -चालत जेंव्हा बहिणाबाई माहेरी पोहोचतात तेंव्हा आपल्या माहेराचे ,माहेरच्या माणसांचे वर्णन त्या आपल्या कवितेतून करतात माहेरचा मोठेपणा, आपल्या पित्याविषयीचा आदर, आई विषयीचे त्यांचे प्रेम यांमधून व्यक्त होते.

**रात दिन गजबज**
**असं खटल्याचं घर**
**सदा आबादी आबाद**
**माझं आसोदं माहेर**

सदा आबादी आबाद म्हणजेच संपन्न व माणसांनी गजबजलेलं त्यांचं 'आसोदं' हे गाव त्यांचे माहेर आहे. आपल्या वडिलांविषयी त्या म्हणतात,

**गावामधी दबदबा**
**बाप महाजन माझा**
**त्याचा काटे तोल न्यावं**
**जसा गावामध्ये राजा**

वडिलांचा गावात असणारा दबदबा ,धाक वरील ओळींमधून व्यक्त होतो .आईची माया कशी होती ते बहिणाबाई पुढील ओळींतून सांगतात,

**माय भिमाई माऊली**
**जशी आंब्याची सावली**
**आम्हाईले केलं गार**
**सोता उन्हात तावली**

जशी आंब्याच्या झाडाची सावली थंडगार, दाट असते तशी त्यांच्या आईची माया ही त्यांच्यावर छाया धरणारी आहे. स्वतः त्रास सहन केला पण त्याची झळही तिने बहिणाबाई व त्यांच्या भावंडांना लागू दिली नाही. बहिणाबाईंनी आपले भाऊ गणा, गमा व बहिणी अहल्या, सीता, तुयसा अशा सर्व भावंडांचे वर्णनही कवितेच्या माध्यमातून केले आहे.

माहेरची संपन्नता बहिणीबाई मोठ्या अभिमानाने सांगतात त्यांच्या माहेरी गाई ,म्हशी भरपूर असल्यामुळे दही, दूध यांची बरकत असल्याचे त्यांनी आपल्या कवितेतून सांगितले आहे.

**माझ्या माहेराच्या वाटे**
**गाई म्हशींची खिल्लार**
**गावामधी बरकत**
**दह्या दुधाची रं ढेर**

माहेरच्या माणसांची ओढ त्यांच्या अनेक कवितेतून व्यक्त होते आई व सासू यामधील फरक बहिणाबाईंनी आपल्या पुढील कवितेतून सांगितला आहे.

**माय म्हनता म्हनता**
**होट होटालागी भिडे**
**आत्या म्हनता -म्हनता**
**केवढे अंतर पडे**

बहिणाबाईंची प्रतिभा जशी उपजत होती तशीच ती आधुनिक भाषा विज्ञानाला अभिप्रेत असणारी ही होती.त्यांच्यामध्ये भाषिक क्षमताही ओतप्रोत भरलेली होती.वरील ओळींमधून हे स्पष्ट होते माय म्हणताना दोन्ही ओठांचा एकमेकांना स्पर्श होतो, पण आत्या म्हणताना त्यांच्यात मोठं अंतर पडते सासूलाच आत्या असे म्हणतात. वरील ओळींमधून अशिक्षित बहिणाबाईंचा भाषाशास्त्रातील दंत्य, ओष्ठ्य व तालव्य याचा जणू अभ्यासच असल्याचे दिसते. पुढे त्या म्हणतात माय ही तोंडातल्या सायी सारखी आहे व बाय ( सासू )ही भरडलेल्या डाळीसारखी आहे .आपल्या कवितेतून त्यांनी ताता, जीजी, काका इ. नात्यांविषयी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत .पुढील ओळींमध्ये त्या म्हणतात.

**जीजी म्हणता म्हणता**
**झाला जिभेला निवारा**
**सासू म्हणता म्हणता**
**गेला तोंडातून वारा**

सासरी सासूने कितीही जीव लावला तरी तिला आईच्या मायेची सर येत नाही व त्यामुळेच प्रत्येक स्त्रीला माहेराची ओढ वाटल्याशिवाय राहत नाही. सूरवाशिणीला समज देताना त्या म्हणतात "घे सोशीसनं घे घालू नको वाद,कर माहेराची याद "अशाप्रकारे बहिणाबाई चौधरी यांनी आपल्या अनेक कवितांमधून त्यांच्या माहेराचे सुंदर वर्णन केले आहे या कवितांमधून जणू काही त्यांचे माहेरच आपल्या डोळ्यासमोर उभे राहते. त्यांच्या या कविता म्हणजे माय मराठीला त्यांनी दिलेले लावण्याचे लेणंच आहेत .१९५१ साली त्यांनी या जगाचा निरोप घेतला. अशिक्षित असूनही जीवनाचे तत्त्वज्ञान सांगणाऱ्या माय मराठीच्या या तेजस्वी लेकीला माझे विनम्र अभिवादन...

**संदर्भसूची:-**
**१) बहिणाबाईंची गाणी:-बहिणाबाई चौधरी (सुचित्रा प्रकाशन)**
**२) आधुनिक मराठी वाङ्मयमाचा विश्लेषणात्मक इतिहास:-डॉ. फुला बागुल (प्रशांत पब्लिकेशन)**
**मराठी काव्यातील स्त्री चित्र:- डॉ. वेदश्री थिगळे(स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस)**

**(कवयित्री, लेखिका व मराठी साहित्याच्या अभ्यासिका)**

# हरहुन्नरी कलाकार काळाच्या पडद्याआड!

आधुनिक केसरी

**१९८० घ्या दशकात मराठी चित्रपट सृष्टीवर अधिराज्य गाजवणारे रसिक मायबाप प्रेक्षकांच्या हृदयावर अधिराज्य गाजवणारे एक गुणी हूरहुन्नरी कलाकार ,एक उमदा, राजबिंडा ,देखणा कलाकार जेष्ठ अभिनेते रवीद्रं हणमंत महाजनी यांचे पुणे येथील आंबी या गावी ते राहत असलेल्या घरी त्यांचे निधन झाले. दुर्दैवाने मृत्यू समयी त्यांच्या जवळ कोणीही नव्हते त्यांच्या निधनाची बातमी दोन दिवसांनंतर समोर आली.**

खरोखर असं निधन त्यांच्या वाट्याला येईल यावर विश्वास बसत नाही.त्यांच्याकडे रूप, प्रसिद्धी , सर्वकाही असतानाही त्यांच्यावर अशी वेळ ओढवेली हे दुर्दैव आहे. त्यांचा एक चित्रपट देवता यातील खेळ कुणाला दैवाचा कळला. हे गीत खुप काही सांगुन जाते. त्यांच्या जीवनात देखील हा प्रसंग खुप काही सांगून जातो. पुणे येथील आंबी या गावी एक्झर्बिया सोसायटीत ते हवापालटसाठी गेले काही महीन्यांपासून राहण्यास आले होते.आयुष्यात त्यांना सर्व काही मिळुन देखील अखेरचे दिवस एकांतात घालवावे लागले तेही एकट्याने यासारखे दुसरे दुर्दैव कोणते असेल. त्यांचं निधन होऊन देखील कोणाला याची पुसटशी कल्पना नाही खुप वाईट वाटले.



संतोष दत्तू शिंदे
संपर्क क्र. ७७२१०४५८४५

रवींद्र महाजनी यांचा जन्म बेळगाव येथे झाला.वडील हनुमंत महाजनी पत्रकार होते.बेळगावहून ते मुंबईत आले.रवीद्रं महाजनी यांचे बालपण मुंबईत गेले.त्यांना लहाणपणापासूनच अभिनयाची आवड होती त्यामुळे स्नेहसंमेलनात ते भाग घेत असत.मराठी चित्रपट सृष्टीत येण्यापूर्वी काही काळ मुंबईतच टॅक्सीचालक म्हणून काम केले .परंतू त्यांना आतला अभिनय स्वस्थ बसू देत नव्हता. व्ही. शांताराम यांच्या झुंज चित्रपटाद्वारे मराठी चित्रपट सृष्टीत पाऊल टाकले.त्याचबरोबर मधुसूदन कालेलकर यांच्या जाणता अजाणता या नाटकात काम केले. यांनतर रवींद्र महाजनी यांनी मागे वळून पाहिले नाही. मुंबईचा फौजदार, देवता, लक्ष्मी, गोंधळात गोंधळ, हळदी कुंकु, थोरली जाऊ,सतीची पुण्याई , लक्ष्मीचे पाऊले,चांदणे शिंपीत जा, काय राव तुम्ही, पैंजण,देऊळ बंद, सर्जा, उनाड मैना अशा दर्जेदार चित्रपटातील भुमिका रसिक मायबाप प्रेक्षक विसरू शकणार नाही. आपल्या अभिनयाच्या जोरावर त्यांना सांस्कृतिक कला दर्पणचा सर्वश्रेष्ठ कलागौरव पुरस्कार देऊन त्यांना गौरविले आहे. अनेक मराठी, हिंदी चित्रपटात त्यांनी आपली छाप पाडली. वयाच्या ७७व्या वर्षी त्यांचे निधन नक्कीच मनाला चटका लावून गेले. त्यांच्या निधनाने मराठी चित्रपट सृष्टी पोरकी झाली आहे. आपण एका हुरहुन्नरी कलाकाराला गमावले आहे. त्यांना रसिक मायबाप प्रेक्षकांच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली.



# सावता माळी

आधुनिक केसरी

**पूणे सोलापूर राज्य महामार्गावर किंवा पुणे हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावर सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील अरण हे ऐक छोटसं गाव आहे. संत साहित्यिकांना या गावचा अभ्यास करावा लागला. त्याला कारणही तसेच आहे . विठ्ठलाचा ऐक भक्त अरण मधे रहातो आणि त्या भक्ताचं नाव आहे "संत सावतामाळी.**

सावत्या माळी हा श्री विठ्ठलाचा निस्सिम भक्त होता. पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांना तो जेवण देत होता. आणि या कारणांमुळे सावत्या विठ्ठलाचा लाडका झाला. सावत्याच्या शेतात गहू पिकवला जायचा पण त्या गव्हाची चोरी व्हायची. आणि मग सावत्याला वाईट वाटत असे. की पोळी करायला गहू तर नाहीत मी वारकऱ्यांच्या ताटात आता काय जेवण वाढू म्हणून तो ऊदास होई. मग त्याने ठरवले की आपण आता भोपळ्याचे शेत करायचे . झाले तर मग शेतात भोपळे पिकवले. आता ते भोपळे कुणी चोरून तर नेणार नव्हते ? सावत्याच्या बायकोने भाजी साठी काही भोपळे फोडले आणि गम्मतचं झाली प्रत्येक भोपळ्यात गहू निघू लागले. मग त्याच्या बायकोने ते गहू दळले व त्याच्या पोळ्या केल्या सर्व स्वयंपाक करून ती माऊली पतीच्या भक्तित सहकार्य करत होती.घरची अन्नपूर्णा जणू काही, तिच्या सेवेने वारकऱ्यांच्या पंगतीच्या पंगती ऊठू लागल्या की! आलेल्या वारकऱ्यांचे स्वागत तो जेवण देऊन करत होता. विठ्ठलाची भक्ति तो अन्नदानाने करत होता. असा हा सावतामाळी पांडुरंगाचा निस्सिम भक्त महाराष्ट्राच्या कानाकोपर्यातून पालख्या आषाढी कार्तिकीला पंढरपूर ला जातात. पण "अरण "हे ऐक असं गाव आहे की तेथून पालखी पंढरीला जात नाही .कारण प्रत्यक्ष पांडूरंगच त्याच्या भेटीला येतो .असे म्हणले जाते. "कांदा मुळा भाजी अवघी विठाई माझी". हा प्रसिध्द अभंग तर आपल्याला माहिती आहेच. तो चांगले कर्म करत विठ्ठल भक्ती करत होता. आणि सत्कर्मात देव बघत होता.त्याच्या या भक्तिला धर्मपत्नीची केवढी मोलाची साथ होती ना! आलेल्यांना जेवण देऊन तृप्त करणे,हे काम सतत चालले होते.आणि म्हणून प्रत्यक्ष देव त्याच्या भेटीला येत होता.आज सावतामाळ्याची पुण्यतिथी आहे, विनम्र अभिवादन म्हणून चांगले कर्म करा.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# उरण तहसीलसमोर ग्रामस्थांचे आंदोलन



आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** तालुक्यातील जुना शेवा कोळीवाडा येथील जमीन जेएनपीटी ( जेएनपीए ) बंदरासाठी संपादित झाली. या जुना शेवा कोळीवाडा ग्रामस्थांचे उरण तालुक्यातील हनुमान कोळीवाडा येथे पुनर्वसन करण्यात आले. मात्र हनुमान कोळीवाडा गावात सर्व घरांना वाळवी लागल्याने व हे जागा राहण्यास योग्य नसल्याने या नागरिकांचा पुनर्वसनाचा प्रश्न ऐरणीवर आला होता. शिवाय शासनाच्या माप दंडा नुसार हे पुनर्वसन झाले नव्हते त्यामुळे गेली ३८ वर्षे जुना शेवा कोळीवाडा ( हनुमान कोळीवाडा )ग्रामस्थांचा पुनर्वसनाचा प्रश्न प्रलंबितच आहे.रायगड जिल्हाधिकारी रायगड यांच्या आदेशानुसार एन.एस.पी.टी प्रकल्प विस्थापित शेवा कोळीवाडा गावाचे ३८ वर्षानी पुनवर्सनाचे मा.तहसीलदार उरण हे जे.एन. पी. टी च्या दबावाखाली हेतूपुरस्पर काम करत नसल्याचे संशयाच्या निषेधार्थ एकता महिला बचतगट हनुमान कोळीवाडा व इतर सर्व महिला बचत गटातर्फे आज दिनांक १७ जुलै २०२३ पासून उरण तहसिल कार्यालयात बेमुदत धरणे आंदोलन सुरु झाले आहे. धरणे आंदोलनाचा हा पहिलाच दिवस आहे.सतत ३८ वर्षे शांततेने लोकशाही व कायदेशीर मार्गाने पत्रव्यवहार करून सुद्धा, संप आंदोलने करून सुद्धा जुना शेवा कोळीवाडा( हनुमान कोळीवाडा )ग्रामस्थांचे मागण्या मान्य होत नसल्याने तहसील कार्यालय उरण समोर धरणे आंदोलन करून जुना शेवा कोळीवाडा ग्रामस्थांनी आपला रोष व्यक्त केला.

शासनाने १२ फेब्रुवारी १९७० च्या अधिसुचने नुसार सन १९८३ साली एनएसपीटी प्रकल्पाला १२ गावाच्या हद्दीतील २९३३ हेक्टर जमिन ( गावठाण वगळून ) संपादून दिली होती. त्या हद्यीत शेवा व कोळीवाडा, जसखार, सोनार, करळ, सावरखार, जासई हि ६ गावे होती. त्या पैकी ५ गावांना न उठवता मा. उपाध्यक्ष जेएनपीटी यांनी दि. १९/०३/२००२ रोजी मा. जिल्हाधिकारी रायगड यांना वाढीव गावठाणासाठी ३७ हेक्टर जेएनपीटी ची जमीन देण्यास सांगितलेली आहे. एक्सीबीट ए च्या आदेशानुसार मा. जिल्हाधिकारी रायगड यांनी दि. /०७/२००२ व १७/०९/२००२ आणि ३१/१२/२००२ रोजीच्या आदेशाने जसखार, सोनार, करळ, सावरखार, जासई इत्यादी ५ गावांना न उठवता वाढीव गावठाणासाठी ३७ हेक्टर जमिन दिलेली आहे. एक्सीबीट बी च्या आदेशानुसार शेवा कोळीवाडा गावाच्या जमिनीची JNPT ला त्या वेळी हि गरज नव्हती आणि आजतागायत गरज लागलेली नाही. आणि भविष्यात सुद्धा गरज लागणार नाही. तरी जेएनपीटी ने विनाकारने गरज नसताना शेवा कोळीवाडा गावाची जमीन घेऊन जेएनपीटीने प्रकल्प विस्थापित शेवा कोळीवाडा गावाचे ३८ वर्ष उलटून हि शासनाचे माप दंडाने मंजूर असलेले पुनर्वसन केलेले नाही. जेएनपीटी ने नित्य नियमाने चाललेला जीवनक्रम उध्वस्त केलेला आहे आणि करत आहे. जेएनपीटीला पुनर्वसन खर्चाची जबाबदारी पेलवत नसताना शासनाने जाणीवपूर्वक केलेली चूक आहे आणि आता सुद्धा शासन जाणीव पूर्वक चूक करत आहे. तहसीलदार यांच्या हातात सर्व अधिकार असताना ते जाणीवपूर्वक पुनर्वसन करण्यास टाळाटाळ करत आहेत.असा आरोप मच्छिमार नेते रमेश कोळी यांनी आपल्या भाषणातून केला.माननीय लोक आयुक्त यांच्या शिफारशी नुसार जेएनपीटी प्रशासनाकडे पडीक असलेली सर्व जमीन तहसीलदार यांनी ताब्यात घेऊन मा.जिल्हाधिकारी यांच्या दि.१६/०५/२०२३ रोजी दिलेल्या आदेशानुसार काम करावे, अशी मागणी रमेश कोळी यांनी यावेळी केली.

हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांचा पुनर्वसनाचा प्रश्न केंद्राच्या अखत्यारीत येतो . जोपर्यंत केंद्र सरकारची परवानगी मिळत नाही तोपर्यंत या ग्रामस्थांचा पुनर्वसनाचा प्रश्न निकाली लागू शकत नाही .हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांचा पुनर्वसनाचा प्रश्न लवकर निकाली लागावा यासाठी मी जेएनपीटी प्रशासनाशी पत्रव्यवहार केला आहे .सदर धरणे आंदोलन चालू असताना मी स्वत : त्या आंदोलन स्थळी जाऊन ग्रामस्थांची भेट घेतली . त्यांच्या समस्या जाणून घेतल्या . त्यांच्याशी संवाद साधला .पुनर्वसनाचा प्रश्न लवकर मार्गी लागावे यासाठी माझे प्रयत्न चालू आहेत . **–उद्धव कदम, तहसीलदार, उरण .**



# नादांतांडा ते देवळगाव रस्त्याची झाली चाळण

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील नांदा तांडा,घाणेगाव तांडा मुख्य रस्त्यावर ते देवळगांव गुजरी जिर्ण अवस्थेत नळकांडी पुलाची दुरुस्ती न करता नवीन उंच पुल बांधण्याची मा.सभापती धरमसिंग चव्हाण यांची मागणी मोठ्या लोकसंख्येचा सावळदबारा गाव असलेल्या तिथे चक्रधर स्वामींचे तिर्थक्षेत्र म्हणून राज्यात प्रसिद्ध आहे.या रस्त्यावर नेहमी वाहनधारकांची वर्दळ असते.बऱ्याच वेळी येथे पाण्याचा अंदाज न आल्याने अपघात झालेले आहे.व विशेष म्हणजे हा मुख्य रस्ता खानदेश मराठवाडा ला जोडणा-या घाटावरचा पहीला गाव म्हणून ओळख असलेला गाव म्हणजे जाळीचा देव कडे हा रस्ता जातो.

या सावळदबारा सर्कल मधल्या रस्त्यांचा प्रश्न नेहमी इकडच्या जनतेला भेडसावत असतो. परंतु दोनच पावसाळ्यात नांदा तांडा गावापासून हाकेच्या अंतरावर दोन असलेल्या घाणेगाव तांडा रस्त्यावरील नळकांडी पुल मोठ्या प्रमाणात जीर्ण हून वाहून गेला. यामुळे अपघात घडण्याचे प्रमाणात मोठी वाढ झाली असून नागरिकांना नाईलाजाने सावळदबारा मार्ग मार्गे औरंगाबाद, बुलढाणा असे जावे लागते विशेष म्हणजे हा नळकांडी पुल पावसाळ्यात नेहमी ईथे थोडा जरी पाऊस पडला कि पुलावरुन जवळपास २/३ फुट वर ओसंडून वाहणाऱ्या पाण्यामुळे ईथे तासनतास वाहतूक कोंडी होऊन जाते.

यामुळे खानदेशासहीत परीसरातील प्रवाशांचे मोठे हाल होऊन जाते.नळकांडी पुलाला तोडून मोठा व उंच पुल बनवून देण्याची मागणी अल्पसंख्याक विकास व औकाफ,पणन मंत्री अब्दुल सत्तार यांच्या सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी केली आहे.शिवसेना शिंदे गट व अब्दुल सत्तार यांचे कार्यकर्ते तथा सभापती धरमसिंग चव्हाण यांनी सांगितले की नांदा तांडा ते देवळगांव गुजरी रस्त्यावरील पुल दुरुस्तीच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम उपविभाग फर्दापूर यांच्या कडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.की हा नळकांडी पुलाची डागडुजी न करता हा पुल पूर्ण पने नवीन व मोठ्या उंचीचा पुल करण्यात यावं अशी मागणी माजी सभापती धरमसिंग चव्हाण व सर्व कार्यकर्ते व गावातील नागरिकांची परिसरातील वाहनधारक व शेतकऱ्यांची आहे.

# अस्तरीकरणाविरोधात फलटणला मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**फलटण :** अनेक गावांनी निरा उजवा कालव्याच्या अस्तरीकरणाला विरोध केलेला असून मंगळवारी रोजी निरा उजवा कालवा बचाव समितीच्या वतीने फलटण येथे भव्य मोर्चाचे आयोजन केलेले आहे. दुपारी ठीक १ वाजता क्रांतिसिंह नाना पाटील चौक येथून मोर्चास सुरुवात करण्यात येणार आहे. फलटण तालुक्यातील विविध ग्रामपंचायत यांचे निरा उजवा कालवा अस्तरीकरण याला विरोध करणारे विशेष ग्रामसभेचे ठराव घेण्यात आलेले आहेत.तसेच विविध गावातील शेतकरी वर्ग ग्रामस्थ यांच्या सह्या ही घेण्यात आलेल्या आहेत.मोर्चाच्या माध्यमातून निरा उजवा कालवा सिमेंट काँक्रेटचे अस्तरीकरण रद्द होण्याबाबतचे निवेदन निरा उजवा कालवा लाभ क्षेत्रातील शेतकरी, शेतमजूर,नागरिक यांच्या वतीने संबंधित विभाग व प्रशासनास देण्यात येणार आहे.निरा उजवा कालवा हा ब्रिटीश कालीन १०० वर्षापूर्वीचा बागायती परिसर आहे. सदर परिसरातील बहुतांश (७०%) शेतजमीन हि वर्षानुवर्ष महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ यांच्याकडे होती.शेती महामंडळ यांच्याकडे सदर जमीन असल्यामुळे या परिसरात विहीर, कूपनलिका पाईपलाईन याची कुठलीही सुविधा नव्हती.परंतु मागील १० वर्षापूर्वी शेती महामंडळाकडील जमीन खंडकरी शेतकऱ्यांना परत करण्यात आली. तदनंतर शेतकरी बांधवांनी शेती महामंडळाकडून सुटलेल्या जमिनीमध्ये आधुनिक शेती करणासाठी विहीर, कूपनलिका या माध्यमातून लाखो रुपयांचे कर्ज काढून पाण्याचे स्त्रोत्र निर्माण केले आहेत.



# जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत गोरगरिबांची मुले शिकत असतात त्यांना आपल्याकडून शैक्षणिक काही मदत व्हावी तसेच आपण समाजाचे काही देणे लागतो या भावनेतून शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले आहे. असे मत शिवसेना उपशहर प्रमुख तथा वैदयकीय साहयक संतोष पवार यांनी यावेळी व्यक्त केले आहे. पिशोर सर्कलमधील माजी जिल्हा परिषद सदस्या शुभांगी केतन काजे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत रामनगर व खोकले आई केंद्र वासडी येथील जिल्हा परिषद शाळेतील १५० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. युवा नेते तथा शिवसेना उपशहर प्रमुख संतोष पवार यांच्या माध्यमातून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अशा या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक जीवनात पुढे जाण्यासाठी नक्कीच प्रेरणा मिळेल. संतोष पवार यांनी केलेल्या या कार्याचे शाळेने आभार मानले आहे. याप्रसंगी शाळेतील मुख्याध्यापक बोलताना म्हणाले की, असे उपक्रम युवकांसाठी प्रेरणादायी ठरतील अशी आशा त्यांनी व्यक्त केली आहे. यावेळी मुख्यध्यापक शिवाजी लोखंडे, प्रवीण सुरडकर, संदीप खरे, यश गायकवाड, सुमित साळुंखे, कारभारी खुर्दे, अंकुश खूर्दे, सुमित साळुंके, सागर नलावडे, अमोल कारबळ यांच्यासह ग्रामस्थांची उपस्थिती होती.

# साहेबराव संभाजी हेमके यांचे दुःखद निधन

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** साहेबराव संभाजी हेमके ( रा. पिंपळकौठा मगरे, ता.मुदखेड, जि. नांदेड ) यांचे दीर्घ आजाराने सोमवारी, दि. 17 जुलै रोजी राहत्याघरी निधन झाले.



त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सून, दोन भाऊ, एक बहीण, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्यावर सोमवारी सायंकाळी पिंपळकौठा मगरे येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी नातेवाईकांसह समाजातील नागरिक उपस्थित होते. हेमके परिवाराच्या दुःखात आधुनिक केसरी परिवार सहभागी आहे.





# पत्रकार संघाच्या धरणे आंदोलनास मोठा प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** महाराष्ट्र शासनाच्या माहिती आणि जनसंपर्क विभागाच्या वतीने, राज्य अधिस्वीकृती व विभागीय अधिस्वीकृती समिती गठित करण्यात आली आहे. मात्र अनेक त्रुटीकडे डोळेझाक पणा करून शासनाने चुकीच्या पद्धतीने समिती गठीत केल्याचा आरोप करत महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने राज्यभरासह नांदेड मध्ये देखील जिल्हाध्यक्ष संग्राम पाटील मोरे यांच्या नेतृत्वाखाली सोमवार (दि.१७) रोजी धरणे आंदोलन करत सदर समिती रद्द करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी धरणे आंदोलनास मोठा प्रतिसाद लाभला होता.\

प्रसारमाध्यमांशी संबंधित व्यक्तींना अधिस्वीकृती देण्यासंबंधी निर्णय घेणाऱ्या समितीची, महाराष्ट्र शासनाच्या माहिती आणि जनसंपर्क विभागाने, राज्य अधिस्वीकृती व विभागीय अधिस्वीकृती समिती गठित करण्याबाबत शासन निर्णय, नुकताच जारी केला आहे. महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र व प्रसारमाध्यम अधिस्वीकृती समितीवर एकूण २७ आणि ९ विभागीय समित्यांवर ४५ सदस्यांची नेमणूक केली जाते. पूर्वीच्या समित्यांची मुदत संपल्यानंतर मध्यंतरी महाविकास आघाडी सरकारने याबाबत कुठलाच निर्णय घेतला नाही. राज्यभरातील पत्रकारांच्या संघटनांनी सातत्याने मागणी लावून धरल्यानंतर अखेर याबाबतचा आदेश नुकताच निघाला. याच आदेशामध्ये मराठी पत्रकार परिषद या संघटनेवर प्रशासक नियुक्त असल्याबाबत धर्मदाय सहआयुक्त पुणे यांनी कळवले असुन प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने संघटनेच्या सदस्यांची नियुक्ती मा. उच्च न्यायालय उक्त निकालाच्या अधिन करण्यात येत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

या संघटनेचे राज्य समितीवर पाच आणि विभागीय समितीवर नऊ असे १४ सदस्य घेण्यात आलेले आहेत. याच पध्दतीने महाराष्ट्र श्रमिक पत्रकार संघटना तीन, महाराष्ट्र संपादक परिषद दोन, मंत्रालय विधीमंडळ वार्ताहर संघ एक, बृहन्महाराष्ट्र जिल्हा वृत्तपत्र संपादक संघ एक, महाराष्ट्र दैनिक वृत्तपत्र संघटना एक आणि महाराष्ट्र साप्ताहिक वृत्तपत्र संपादक परिषद एक असे सदस्य घेण्यात आले आहेत. सेवाभावी संस्था आणि श्रमिक संघटनांसाठी स्वतंत्र विभाग आणि कायदे असताना महाराष्ट्रात बहुतांशी पत्रकारांनी धर्मदाय आयुक्त यांच्याकडेच नोंदणी करुन सदरील प्रमाणपत्रे दाखल केली आहेत. माहिती आणि जनसंपर्क विभागासह सामान्य प्रशासन विभागानेही कोणतीही खातरजमा न करता काही लोकांच्या प्रभावामुळे चुकीच्या पध्दतीने अधिस्वीकृती समितीवर सदस्यांची नियुक्ती केली आहे.

मराठी पत्रकार परिषद या एकाच संस्थेच्या १४ जणांना सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. त्यामुळे चुकीच्या पध्दतीने संस्थांना संघटना दाखवून सदस्यांची नियुक्ती प्रक्रिया करणाऱ्या अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करावी आणि नियमानुसार कामगार आयुक्त यांच्याकडे कामगार कायद्यांतर्गत नोंदणी असलेल्या संस्थांना प्राधान्य द्यावे. अन्यथा राज्यभर आंदोलन करण्यात येईल. असे निवेदनात म्हटले आहे. यावेळी प्रमुख उपस्थिती प्रदेश कार्यकारिणी सदस्य अभयकुमार दांडगे, जिल्हा सरचिटणीस रूपेश पाडमुख दिले आहे जिल्हाध्यक्ष संग्राम मोरे यांच्यासह लक्ष्मीकांत मुळे, निळकंठ मदने, गुणवंत विरकर, उद्धव सरोदे, प्रफुल्ल मोटरवार, मोहन पवार, व्यंकटी गोरे, आनंद मोरे, विश्वनाथ शिंदे, सुनील चव्हाण, गजानन दांगटे, आंबादास पवार, संग्राम चव्हाण, शेख कलीम, वैभव माटे, संजयकुमार गायकवाड, विठ्ठल गिरडे आदीजन उपस्थित होते.

# सुरेखा गरगडे जिल्हा संपर्कप्रमुखपदी नियुक्त

आधुनिक केसरी न्यूज



**फुलंब्री :** राष्ट्रीय उपाध्यक्ष ( भारत )योग माननीय विजय नवल पाटील यांनी AIMA चे व्हॉईस चेअरमन माननीय श्री डॉक्टर नितीनराजे पाटील यांच्या आदेशानुसार सौ सुरेखा दत्तात्रय गरगडे यांची आयुष्य इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन ( AIMA ) औरंगाबाद विभाग योग जिल्हा संपर्कप्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली आहे संघटनेच्या वतीने तसेच योगसाधक मित्रपरिवार व नातेवाईक यांनी त्याची अभिनंदन केले आहे.

# जिल्हा कार्याध्यक्षपदी मच्छिंद्र उबाळेंची निवड

आधुनिक केसरी न्यूज



**सुलतानपूर :** खुलताबाद तालुक्यातील खांडी पिंपळगाव येथील मच्छिंद्र उबाळे यांची अखिल भारतीय छावा संघटनेच्या जिल्हा कार्याध्यक्षपदी जिल्हाध्यक्ष किशोर शिरवत यांच्या हस्ते निक्युतीपत्र देऊन निवड करण्यात आली .या निवडीचे युवक जिल्हा अध्यक्ष अमोल काळे , जिल्हा उपाध्यक्ष प्रशांत खंडागळे, खुलताबाद ता. अध्यक्ष योगेश मालोदे दीपक उबाळे, संजय मरकड यांनी निवडी बद्दल त्यांचे अभिनंदन केले.

# संत शिरोमणी सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त विविध कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** येथील संत सावतानगर मध्ये संत सावता महाराज पुण्यतिथी निमित्त रविवार( ता.१६ ) रोजी भांगशी माता गड चे श्री श्री १००८, महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरी जी महाराज यांचे प्रवचन, महाप्रसाद वाटप व मिरवणूक काढण्यात आली. महाराजांचं पूजन सजनराव गायकवाड,दिलीप गायकवाड,रतीलाल गायकवाड, दौलत गायकवाड यांनी पूजन केले, प्रास्ताविक व संचलंन धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले. या सावतानगर मध्ये सभामंडप साठी आ. रमेश पा. बोरनारे यांनी आर्थिक सहाय्य केले. तर माजी नगराध्यक्ष डॉ,दिनेश परदेशी यांनी पेव्हर ब्लॉक बसवून द्यायचे मान्य दिले,त्यांचे विशेष आभार मानण्यात आले,या प्रसंगीं माजी सभापती मंदाताई गायकवाड,सरपंच कविता गायकवाड, बाळू बनकर,कि सन राऊत, संजय गायकवाड, अशोक बनकर, सोनवणे सर,भाऊसाहेब गायकवाड, श्रीराम गायकवाड, रामेश्वर पेहरकर,कारभारी गायकवाड, करणं जेजुरकर, राजू राजपूत,भानुदास गायकवाड,गौतम गायकवाड, गाडेकर यांची व अनेक नागरिकांची उपस्थिती होती.



# अपघातात एक जण ठार तर एक गंभीर जखमी

आधुनिक केसरी न्यूज



**बिडकिन :** रविवारी सायंकाळी अंदाजे ६ वाजेच्या सुमारास पावसाच्या रिमझिम मध्ये चितेगाव कडुन बिडकिन कडे जाणारी दुचाकी क्रमांक MH 20 EV 2157व धुत कंपनी कडून चितेगाव कडे जाणारी दुचाकी क्रमांक MH 20 FZ 7006 यांच्यात जोराची समोरासमोर धडक झाल्याने एक जण उपचारदरम्यान मयत झाला आहे तर एक जण गंभीर जखमी झाला असून औरंगाबाद येथे उपचारासाठी हलविण्यात आला आहे.मयत राजु रामदास चव्हाण, वय ३० वर्षे,रा.बिडकिन ,ता.पैठण असे आहे.तर गंभीर जखमीचे नाव गजानन रामराव खोसे, वय.२८ वर्षं,रा.प्रतापनगर, औरंगाबाद असे आहे. राजु चव्हाण याला उपचारासाठी औरंगाबाद कडे नेत असतानाच प्राणज्योत मालवली आहे.ग्रामीण रूग्णालय बिडकिन येथे दाखल केले असुन वैद्यकीय अधिकारी डॉ संजय गोरे तपासून मयत घोषीत केले असुन शवविच्छेदन करण्यात आले आहे. राजु चव्हाण यांच्या अपघाती निधन झाल्याने बिडकिन परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# मागण्या मान्य न झाल्यास मेंढी मोर्चा काढणार : फटाकडे यांचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** मल्हार महासंघ महाराष्ट्र राज्य मौजे टाकळी ( खुर्द ) ता. सिल्लोड जिल्हा छत्रपती संभाजीनगर ( औरंगाबाद ) येथे शाखा उदघाटण संपन्न या वेळी उद्घाटक म्हणून मा. अब्दुल सत्तार साहेब ( कृषि मंत्री ) व कार्यकर्माचे प्रमुख पाहुणे मल्हार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष श्री. रामदासजी दादा कोळेकर, मल्हार महासंघाचे प्रदेश उपाध्यक्ष श्री. संतोषजी थोरात प्रदेश संघटक रामेश्वर लव्हाळे, मराठवाडा संजय जी फटाकडे, मराठवाडा प्रमुख आनिल वाढोणकर, आर्जीनाथ खिल्लारे, मीराताई जानराव सौ. सविता शिंदे महिला जिल्हाध्यक्ष, सौ. अन्नपूर्णा सोनगिरे, श्री. गजानन साबळे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष, विठ्ठल खिल्लारे, तालुका अध्यक्ष सिल्लोड, संतोष दांगोडे, टाकली ( खुर्द ) शाखा कार्यकारणी शाखा अध्यक्ष धोंडीराम खिल्लारे, उपअध्यक्ष कडुबा गोरे, चिटनीस बाजीराव जेठे, सरचिटणीस विनोद जेठे, कार्याध्यक्ष, काकासाहेब खिल्लारे संघटक, उत्तम खिल्लारे, कोषाध्यक्ष, भगिनाथ गोरे सहकोष्याध्यक्ष, रेवनाथ जेठे सह संघटक, राजू जेठे प्रसिद्ध प्रमुख, बालू जेठे, संपर्क प्रमुख, मथाजी जेठे, सल्लागार व सर्व जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, तसेच ग्रामपंचायत सरपंच-उपसरपंच, सदस्य आदी पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. यावेळी आयोजक - दत्ता जेठे, मल्हार महासंघ जिल्हा उपध्यक्ष, यांनी आभार मानले.





|| नमो ||
*शुभ कार्य तुमचे व्यवस्था आमची*

**विनोद मंडप**
**डेकोरेटर्स अँड केटरर्स**
लग्न, मुंज, रिसेप्शन, वाढदिवस, वास्तूशांती, शुभ कार्याच्या ऑर्डर स्वीकारल्या जातील.
प्रो.प्रा. विनोद जोगदंडे
9158500727, 8446185722
टाऊन हॉल, व्हीआयपी रोड, छत्रपती संभाजीगर

# एक हजार एपीआय पदोन्नती प्रक्रिया रखडली दहा महिन्यांपासून प्रतीक्षा

आधुनिक केसरी न्यूज

**राहुल वासनिक**

**यवतमाळ :** कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक व पोलील उपनिरीक्षकांची अनेक पदे रिक्त आहे. अशातच एक हजारावर सहाय्यक पोलीस निरीक्षकांच्या पदोन्नतीची प्रक्रिया रखडली आहे. अपर पोलीस महासंचालक, आस्थापना यांनीच दिलेल्या एका पत्रानुसार, पोलीस निरीक्षक पदोन्नती समितीची बैठक २१ मार्च २०२३ रोजी घेण्यात आली. त्यात पदोन्नतीसाठी पात्र / अपात्र अधिकारी देखील निश्चित करण्यात आले आहे. मात्र १० महिने होवुनही सहाय्यक पोलीस निरीक्षकांना पदोन्नती दिली नसून, फाईल धुळखात पडून असल्याची माहीती सुत्रांनी दिली. सहाय्यक पोलीस निरीक्षकांना पोलीस निरीक्षक पदी पदोन्नती देण्यासाठी दिनांक ८ ऑगस्ट २०२२ रोजी १०१६ जणांची माहिती मागवली आली. पदोन्नतीवरील स्थगिती दिनांक १९ डिसेंबर २०२२ रोजी उठली असून, परत कोणतीही स्थगिती कोणत्याही न्यायालयाने दिलेली नसतानाही अद्याप पदोन्नती प्रक्रिया पूर्ण केली नाही. अपर पोलीस महासंचालक, आस्थापना यांनीच दिलेल्या एका पत्रानुसार, पोलीस निरीक्षक पदोन्नती समितीची बैठक दिनांक २१/३/२०२३ रोजी पार पडली. त्यात पदोन्नतीसाठी पात्र व अपात्र अधिकारी देखील निश्चित करण्यात आले आहेत, तरीही पदोन्नती दिली नाही. दरम्यान, सन २०२३ - २४ ची सर्वसाधारण बदली करण्यात आली आहे. जी पदोन्नती प्रक्रिया २०२२-२३ च्या प्रक्रियेनंतरची प्रक्रिया आहे. त्यात जाणीवपूर्वक विविध महसूली संवर्गात पदोन्नतीसाठी उपलब्ध असणारी पदं भरण्यात आली आहे.

पदोन्नती प्रक्रिया विनाकारण प्रलंबित ठेवल्याने संबंधित अधिकाऱ्यांच्या पाल्यांच्या शिक्षणावर याचा विपरीत परिणाम झाला आहे. शैक्षणिक वर्ष सुरू झाल्याने आता शैक्षणिक प्रवेश घेऊन झालेला आहे आणि आता पदोन्नतीवर अधिकाऱ्यांच्या नेमणूका इतर ठिकाणी झाल्यास तेथे पाल्यांना पुन्हा वेगळा शैक्षणिक प्रवेश घ्यावा लागेल, जे अशक्य आहे कारण आता शैक्षणिक प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

पदोन्नती प्रतिक्षेत असलेल्या अधिकाऱ्यांना लवकरात लवकर पदोन्नती देऊन त्यांच्या पाल्यांच्या शिक्षणावर विपरीत परिणाम होणार नाही, अशा प्रकारे त्यांना नेमणूका दयाव्यात अशी मागणी होत आहे.

**समर्पण प्रतिष्ठानचे मुख्यमंत्र्याना निवेदन :** राज्यात महिला अत्याचारासह गुन्हेगारीच्या घटना सातत्याने घडत असून, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे . राज्यात अनेक पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षकांची पदे रिक्त आहे . तर दुसरीकडे गेल्या दहा महिन्यापासून सहाय्यक पोलीस निरीक्षकांच्या पदोन्नतीची प्रक्रिया रखडली आहे . या संदर्भात निर्णय घेवून सहाय्यक पालीस निरीक्षकांच्या पदोन्नतीचा प्रश्न निकाली काढावा अशी मागणी समर्पण प्रतिष्ठान नांदेडचे अध्यक्ष मधुकर केंद्रे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे .

# आठवडी बाजार चिखलाच्या साम्राज्यात

आधुनिक केसरी न्यूज

**गोंदिया:** अर्जुनी मोरगाव, नगरपंचायत आणि तालुक्याचे ठिकाण असणाऱ्या अर्जुनी येथे भरणारा आठवडी बाजार चिखलाच्या साम्राज्यात भरतो आहे. केवळ कमिशन खोरीच्या नादात असणारे येथील पदाधिकारी आणि अधिकारी यांना याचा काहीच सोयर सुतक नाही. २०१५ ला या ग्रामपंचायतचे नगर पंचायत मध्ये रूपांतर झाले. नगर पंचायतचा थेट राज्य शासनाची संपर्क येतो. भरपूर प्रमाणात नगरपंचायतींना निधी मिळतो. तालुक्याचे ठिकाण म्हणून ओळख असलेले अर्जुनी शहर विकासाच्या प्रतीक्षेत होते.नगरपंचायत झाल्याने शहराचा कायापालट होईल अशी आशा नागरिकांना होती. आठ वर्षे लोटली मात्र नागरिकांचा भ्रमनिरास सुरू आहे. ही नगरपंचायत सध्या आठवडी बाजारातील चिखलाच्या साम्राज्याने चर्चेचा विषय झाली आहे. शहराचा विकासात्मक सूक्ष्म नियोजन आराखडा तयार करून नागरिकांना उत्तम सुविधा देणे नगरपंचायतचे कर्तव्य , मात्र दर शनिवारला भरणारा आठवडी बाजार पायाभूत सुविधांच्या अभावी भरवीला जातो. या नियोजित जागेवर धनदांडग्याणी कायमस्वरूपी अतिक्रमण करून बाजार वाडीची जागा घशात घातली आहे. नगरपंचायतच्या मालकीची जागा असूनही महसूल विभागाच्या हेलिपॅड मैदानावर बाजार भरविला जातो.

# जतमध्ये विविध मागण्यांसाठी भाजप व मित्र पक्षांचे रास्ता रोको आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**जत :** सांगलीच्या जत तालूक्यात दुष्काळ प्रश्नी सत्ताधारी भाजप व मित्र पक्ष व तालूक्यातील जनतेकडून आज विविध मागण्यांसाठी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. जत तालुका दुष्काळी जाहीर करावा, विस्थारीत म्हैसाळ योजनचे संपूर्ण टेंडर प्रक्रिया राबवून तातडीने काम सुरु करावे, जनावरांसाठी चारा छावणी किंवा डेपो सुरु करावेत, म्हैसाळ आवर्तन सुरु करण्यात यावे, जत शहराचा अमृत योजनेत समावेश करावा या मागण्यासाठी भाजप व इतर मित्र पक्षांच्या वतीने सोमवारी जत मध्ये विजापूर गुहागर मार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचे नेतृत्व माजी आमदार विलासराव जगताप व जिल्हा बँकेचे संचालक प्रकाशराव जमदाडे यांनी केले. या आंदोलनात तालुक्यातील शेकडो शेतकरी सहभागी झाले होते. तर शहरातील व्यापाऱ्यांनीही पाठिंबा दिला. आंदोलनासाठी ग्रामिण भागातूनही लोकांनी उपस्थिती नोंदवली.

सकाळी साडे अकरा वाजता बाजार समिती आवारातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून या आंदोलनास सुरुवात झाली. त्यानंतर आंदोलनकर्ते येथील महाराणा प्रताप चौकात येत त्यांनी ठिय्या मारत विजापूर गुहागर मार्ग रोखून धरला. यामुळे विजापूर, सांगोला, सातारा, अथणी मार्गांवरील वाहतूक ठप्प झाली. दुपारपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. सरकार व प्रशासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात येत होती. जोवर सरकार सवलती देण्यासंदर्भात ठोस निर्णय घेणार नाही, तोवर आंदोलन मागे नाही असा पवित्रा घेण्यात आला.

यावेळी प्रमोद सावंत, आकाराम मासाळ, भैय्या कुलकर्णी, रवींद्र सावंत, रामन्ना जीवनणावर, बसगोंडा जबगोंड, बसवराज धोडमाळ, प्रभाकर जमदाडे, संजय कांबळे, विकास साबळे, दिग्विजय चव्हाण, आण्णा भिसे, बसवराज चव्हाण, पिंटू माने, संतोष मोटे, अजिक्य सावंत, प्रकाश मोटे, तम्मा सगरे, किरण साळुंखे, पिंटू तंगडी, गौतम ऐवळे, आनंदराव पाटील, विठ्ठल निकम, महादेव माळी, प्रविण सावंत, शिवानंद हाक्के, परशुराम बंडगर, चिदानंद चौगुले, लक्ष्मण सिदरेड्डी, बापू पाटील, अभिजित चव्हाण, तेजस्वानी होनमाने, अविनाश गडीकर, संतोष कोळी, आदी पदाधिकारी सहभागी झाले होते.





# प्रत्येकाने वर्षातून कमीत कमी एक झाड लावणे व संगोपन करणे काळाची गरज

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** पर्यावरणाचे संरक्षण करावयाचे असेल तर जास्तीत जास्त झाडे लावून त्याचे संगोपन करणे गरजेचे आहे. सकाळपासून संध्याकाळपर्यंत जन्मापासून मृत्यूपर्यंत प्रत्येक ठिकाणी लाकडाचा म्हणजेच झाडाचा उपयोग होतो. लाकडाची अवजारे, लेखणी साहित्य, कागद, फर्निचर, खेळणी, पलंग, दरवाजे, खिडक्या, जवळजवळ प्रत्येक ठिकाणी जीवनात लाकडांचा म्हणजेच झाडाचा उपयोग होतो. झाडामध्ये झाडामुळे ऑक्सिजन मुबलक मिळते, जमिनीची झीज होत नाही, पाऊस वेळेवर पडतो वगैरे..वगैरे... तेव्हा प्रत्येकाने दरवर्षी वाढदिवसानिमित्त, वर्षगाठ निमित्त, कोणत्या ना कोणत्या कारणानिमित्त एक झाड लावावे व त्याचे संगोपन करावे. संगोपन फक्त पाच ते सहा वर्ष करण्याची गरज, नंतर झाडे आपलं अन्न पृथ्वीच्या उदरातून मिळवतात व जिवंत राहतात. पतंजलीचे अनिल अमृतवार 2018 पासून दरवर्षी त्यांच्या जन्मदिनानिमित्त दहा स्वदेशी जातीचे झाडे लावतात व त्याचे संगोपन करण्याचा प्रयत्न करतात. आज 16 जुलै रोजी नांदला-दिग्रस ठिकाणी आदरणीय विश्वनाथराव तिडके यांच्या शेतात विविध देशी जातीचे 10 झाडे लावण्यात आले. 2018 साली हदगाव तालुक्यातील आदरणीय संजयराव मामीडवार यांच्या शेतात विविध देशी जातीचे दहा झाडे लावले, त्यापैकी जांभळाच्या झाडाला यावर्षी जांभूळ लागले. तसेच 2019 आली लावलेले आवळ्याचे झाड 10 फूट उंच झाले आहे दोन-चार वर्षात त्याला आवळे पण लागतात. सांगायचं तात्पर्य झाडे लावणे व जगवणे काळाची गरज आहे. या वृक्षारोपणा प्रसंगी आदरणीय जगन्नाथ ऐलवाड, नामदेवराव मोहिते, स्वप्निल मोहिते, अशोक कुरुडे, उत्तमराव वट्टमवार, वसंतराव कल्याणकर, शिवाजीराव मुलूगे, सिताराम सोनटक्के, दिगंबर पाटील, सोपानराव काळे, रेवनसिद्ध स्वामी, सुरेखाताई घोगरे, नंदिनीताई चौधरी, वैजयंतीताई वायचळ, अनुसयाताई जाधव, रघुनाथजी जाधव, सुनंदाताई बंडे, शोभाताई पतंगे, शंकरलाल यादव, राजीव यादव, चिरंजीव आदेश, अभय, कुमारी अविका आदी मान्यवर उपस्थित होते. वृक्षारोपणानंतर शेतमालक विश्वनाथराव तिडके व सौ तिडके यांचा पतंजली परिवारातर्फे सन्मान करण्यात आला व अंगतपंग जेवणाने कार्यक्रमाची सांगता झाली असे अनिल अमृतावर यांनी सांगितले.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# सावता महाराज, संत नामदेव महाराज पुण्यतिथी साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** येथील पेठ विभागातील संत सावता महाराज मंदिरात दि.८जुलै ते१६जुलै पर्यंत श्री संत सावता महाराज व संत नामदेव महाराज या दोन संताच्या पुण्यतिथीनिमित्त अचित्य साधुन ७दिवसीय सप्तहाचे अयोजन करण्यात आले होते.

या सप्ताहाची सांगता दि.१६ रविवार रोजी श्री ची पालखी टाळ, विणा, मृदंग, हरिनामाच्या गजरात मिरवणूक काढुन मंदिरात पालखी विसर्जनानंतर हभप सिताराम महाराज रोडगे याचे काल्याचे कीर्तनानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते .

या महाप्रसादाचे अन्नदाते संस्थान अध्यक्ष भगवानराव राऊत, भरत राऊत, आनंता मुंजे यानी केला ,हा सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी व या मिरवणुकीत भगवानराव राऊत, नानासाहेब राऊत, मिनाताई राऊत, माऊली महाराज चव्हाण, बापुराव जाधव महाराज,आसारामआवचार, ओमप्रकाश लोखंडे, संस्थान सचिव एकनाथ आवचार पत्रकार, विठ्ठल चव्हाण, हरिभाऊ क्षीरसागर शाहीर रघुनाथ क्षिरसागर, मुरलीधर करसकर, देवीदास देशमुख, शिवाजी देशमुख, विठ्ठल घाटुळ,गंगाधर वानखरे,विश्वनाथ काळे, ज्ञानेश्वर कटारे, भिमराव घाटुळ,एकनाथ घाटुळ, पंजाबराव महाराज काळे, विष्णु वानखरे,मदन राऊत, जनार्दन राऊत, शकंर कटारे, सचिन लंबे,ऊत्तम राऊत, गुरूप्रसाद तमशेटे,जगन्नाथ क्षीरसागर,बालु रासवे, कृष्णा घाटुळ,ज्ञानेश्वर रासवे,दत्ता कटारे, सचिन घाटुळ,शाम राऊत, धनजय राऊत, दिपक भाग्यवंत, राजेश सोनी,मुकुंद मुंजे, यांच्यासह येथील संत सावता भजनी मंडळ, मारोती मंदिर भजनी मंडळ,गोकुळेश्वर भगवान भजनी मंडळी,गणपती मंदिर भजनी मंडळ,बसवेश्वर भजनी मंडळ,मोहाडी,गिते पिंपरी, सावंगी,वाडी,मानमोडी,शिगटाळा, देवगाव ब्राम्हणगाव,जाभरुण यांच्यासह परीसरातील सर्व भजनी मंडळी व येथील सर्व समाज बांधव व भाविक भक्तांनी या मिरवणुकीत सहभागी होऊन परिश्रम घेतले आहे,ही सावता महाराज पुण्यतिथीचा कार्यक्रम



उत्साहात व आनंदात पार पडला आहे. येथील संत सावता महाराज मंदिर संस्थानला सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त अयोजीत कार्यक्रमात काँग्रेस चे नेते सुरेश नागरे यांनी ५०हजार रु ची देणगी देऊन येथील उर्वरित जी कामे बाकी आहेत ती सुध्दा मी करून येथील मंदिरात सुविधां उपलब्ध करून देण्यात येईल असे प्रतिपादन येथील नानासाहेब राऊत यानी या संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रमात बोलत आसताना व्यक्त केले .

# रेणुका घोरपडे शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र

आधुनिक केसरी न्यूज

**राजूर :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या इयत्ता पाचवी स्कॉलरशिप( पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा ) सन २०२३ ची गुणवत्ता यादी नुकतीच जाहीर करण्यात आलेली असून यामध्ये भोकरदन तालुक्यातील सिद्धार्थनगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थिनी रेणुका सुधाकर घोरपडे शिष्यवृत्ती परीक्षेत ८४.६६ टक्के गुण घेऊन भोकरदन तालुक्यात सातवा क्रमांक व जिल्ह्यात दहवा क्रमांक मिळवला आहे. तिच्या या यशाबद्दल केंद्रप्रमुख अण्णा इंगळे, केंद्रीय मुख्याध्यापक पी.पी. पालोदे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दीपक जावळे,अनिल वरकड, गजानन लहाने शाळेचे मुख्याध्यापक आर.एच.दानवे, आदींच्या हस्ते रेणुका घोरपडे हिस गौरविण्यात आले.यावेळी अरुण जावळे,वंदना राऊत, पंचफुला जावळे, उषा जावळे यांची उपस्थिती होती.





# जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे नामकरण करा : हरिभाऊ बागडे

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा पिरबवाडा ता. फुलंब्री शाखेच्या सेंटर च्या उद्‌घाटन प्रसंगी आमदार हरिभाऊ बागडे ( नाना ) ( माजी विधानसभा अध्यक्ष महाराष्ट्र राज्य ) यांनी चेअरमन नितीन पाटील यांना जिल्ह्याचे नाव बदलण्याची ठराव सरकारने घेतलाच आहे त्यामुळे बँकेचे नाव बदलायला हरकत नाही अशी सूचना केली. एटीएम चे उद्‌घाटक म्हणून उपस्थित असलेले मा. ना. श्री. अब्दुल सत्तार साहेब ( सहकार, पणन व अल्पसंख्याक मंत्री महाराष्ट्र राज्य ), मा. श्री. नितीन पाटील साहेब, ( अध्यक्ष जि. म. सहकारी बँक ), अर्जुनराव गाडे, श्री. सुहास सिरसाठ, श्री. जावेद पटेल, श्रीकृष्ण तांबोळी श्री राऊंफ कुरेशी, शिवाजी महाराज पाथ्रिकर, अजय मोटे, अभिषेक गाडेकर,सर्जेराव पाटील मेटे, फुके ताई, राहुल डकले, सयाजीराव बाघ, सोमनाथ कोलते, डॉ. सारंगधर गाडेकर, देविदास काळे, दादाराव गाडेकर, दिलीप कोलते, कचरु गाडेकर, एकनाथ गाडेकर, कौतिक साळुंखे, काटकर सर, परिसरातील आजी माजी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सोसायटी चेअरमन व्हाईस चेअरमन संचालक बँक ग्राहक शेतकरी मोठ्या प्रमाणावर याप्रसंगी उपस्थित होते.

# शेती तंत्रज्ञानाचा अंगीकार ही काळाची गरज

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** शेती शेत्रातील विविध समस्या वाढत आहेत त्यासाठी आधुनिक व व्यावसायिक शेतीचा अंगीकार ही काळाची गरज ठरत आहे असे प्रतिपादन चंद्रशेखर घुले पा.यांनी केले. मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्थेचे कृषि विज्ञान केंद्र, दहिगाव-ने येथे भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली च्या ९५ व्या स्थापना दिनाच्या निमित्ताने आयोजित तंत्रज्ञान दिवसाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते अध्यक्षपदावरून बोलत होते.

भारतातील कृषि क्षेत्रातील सर्वोच्च संस्था भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचा १६ जुलै हा दिवस प्रत्येक वर्षी स्थापना दिवस म्हणून साजरा करण्यात्त येतो. या वर्षी १६ ते १८ जुलै २०२३ दरम्यान तंत्रज्ञान दिवस साजरा करण्यात येत आहे. याच निमित्ताने १६ जुलै रोजी कृषि विज्ञान केंद्र, दहिगाव-ने येथे शेतकरी व ग्रामीण युवकांसाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तीनही दिवस भेट देणाऱ्या शेतकरी, महिला, युवक व कृषि विस्तारक यांचेकरिता कृषि प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनीचे उद्‌घाटन चंद्रशेखर घुले पा. व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अतिथी म्हणून बोलतांना नेवासा पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री सुरेश पाटेकर यांनी बदलत्या शेत परिस्थितीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करावाच लागेल आणि तो करतांना केव्हीके दहिगाव ने चा फायदा शेतकऱ्यांनी घ्यावा हे सांगितले. मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्थेचे विश्वस्त श्री काकासाहेब शिंदे यांनी भागातील शेतकऱ्यांनी एकरी उसाची उत्पादकता वाढवावी व उस शेतीला शेणखत व इतर फायदांसाठी दुग्धव्यवसाय करावा व याकामी केव्हीके ची मदत घ्यावी असे नमूद केले. यावेळी त्यांनी केव्हीके दहिगाव ने द्वारे सुरु असलेल्या विविध उपक्रम व सेवा सुविधांची व सद्य स्थितीमध्ये पिकांचे व्यवस्थापन बद्दल माहिती दिली. शेतकऱ्यांना पिकांवरील कीड व रोग याबद्दल माणिक लाखे, नवीन फळबाग लागवड व फळ व भाजीपाला पिकांवरील समस्याबद्दल श्री नंदकिशोर दहातोंडे यांनी मार्गदर्शन केले.


हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा

- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन



अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

